संगीता जोशी

# मूल्यकथा

# मूल्यकथा

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# मूल्यकथा

संगीता जोशी

ई साहित्य प्रतिष्ठान

मूल्यकथा

संगीता जोशी
A-1, भूषण अपार्टमेंट,
11/2, कर्वेनगर, कमिन्स कॉलेजजवळ, पुणे 411052
Phone : 9665095653, 7722006363
sanjoshi729@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे.
तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : २९ जून २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# संगीता जोशी



ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े प्रसिद्ध होणारे संगीता जोशी यांचे हे आठवे पुस्तक.

सांप्रत मराठी कविता आणि विशेषतः मराठी गझलच्या रसिकांना संगीता जोशी यांची नव्याने ओळख करून द्यायची गरज नाही. मराठीतील त्या पहिल्या मराठी गझलकार. २००४ सालच्या अमरावती येथील मराठी गझल संमेलनाच्या त्या अध्यक्षा होत्या. त्यांची आजवर प्रसिद्ध झालेली म्युझिका, वेदना संवेदना, चांदणे उन्हातले, मराठी गझल, नजराणा शायरीचा भाग १ व २, ती भेटते नव्याने अशी अनेक पुस्तके रसिकांच्या मनात स्थान करून आहेत. अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आले आहे. अनेक सभा, मैफ़ली व संमेलनांतून त्यांनी आपले काव्य सादर केले आहे. टिव्ही मालिका, ध्वनीमुद्रिका यांतून त्यांची गीते प्रसिद्ध झाली आहेत. गेली पन्नास वर्षांहून अधिक काळ त्या लिहीत आहेत.

या सर्व सन्मानांमध्ये गुंतून न रहाता त्यांचा लेखनप्रवास सुरूच आहे. आणि त्यासाठी त्या नवनवीन माध्यमांचा मागोवा घेत असतात.

त्यांच्या विविध नियतकालिकांतून अनेक स्फ़ुटकथा प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांचे संकलन करून ई साहित्यतर्फ़े मूल्यकथा १ व २ प्रकाशित होत आहेत. त्यानंतरही संगीता जोशी यांच्याकडून भरपूर लेखनाची अपेक्षा आहे आणि त्या ती पूर्ण करतीलच.

# संगीता जोशी यांची ई साहित्यतर्फ़े प्रकाशित पुस्तके

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ye_chamanajar_sangeeta_joshi.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/urdu_shayari_sangeeta_joshi.pdf


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/urdu_shayari_2_sangeeta_joshi.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ney_kuthehi_vadala_sangeeta_joshi.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/mddb_dattopant_deshpande.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/bsbb_sangeeta_joshi.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/gajhalaayan_sangita_joshi.pdf







ई साहित्यतर्फ़े प्रकाशित झालेले संगीता जोशी यांचे साहित्य
















# कथानुक्रम

**मनोगत**

1. जलसाक्षरता
2. सँटा क्लॉज
3. धन
4. नमस्काराचे महत्त्व
5. संस्कारांची गरज
6. ‘आहे रे’ आणि ‘नाही रे’
7. अब्बू खां ची बकरी
8. आपले सण
9. गायत्री मंत्र
10. सुख आणि आनंद
11. ऑल्वेज बी एलर्ट
12. वर्ण आणि जात—सब झूट!
13. तुम्ही फक्त सुरुवात तर करा! ...
14. ऋषी कोणाला म्हणावे?
15. त्याला मित्र करू या
16. पगार
17. दान
18. श्रेष्ठ दान; अवयव-दान
19. ताजमहल
20. सेवा व्रत
21. छोट्या मिनीची मोठी गोष्ट
22. मनुष्यजन्म-अनमोल हिरा.
23. ते ऑपरेशन

# मूल्यकथा—मुलांसाठी (....खरं तर सर्वांसाठी)

## मनोगत---

आजकाल, समाजात, देशात सर्व ठिकाणी मूल्यांचा ऱ्हास झाल्याचे आपल्या सर्वांच्या अनुभवाला येते. आपण हळहळतो. सगळी जबाबादारी शाळेतील शिक्षकांवर आहे असे समजतो. शालेय वयातच ही मूल्ये मुलांच्या मनात रुजविली पाहिजेत, हे सत्य आहे. मात्र शिक्षकांच्या जबाबदाऱ्या वाढल्यामुळे त्यांना कामाचा इतका ताण असतो की यासाठी वेगळा वेळच नसतो. अभ्यासक्रमाला जोडूनच त्यातून काही मूल्ये रुजवावीत अशी क्षमता सर्व शिक्षकांकडे नसतेही. सुटीतही कामेच असल्याने मूल्ये रुजतील अशा गोष्टी शोधणेही शक्य होत नाही. मीही शिक्षिका होते. या सर्वातून मी गेलेली आहे. इच्छा असूनही ते जमले नाही.

निवृत्त झाल्यावर दीर्घ काळानंतर मला संधी मिळाली. ‘बाल विकास’ हे मुंबईतून व ‘सनातन सारथी’ हे पुण्यातून अनुक्रमे इंग्रजी व मराठीतून प्रसिद्ध होणारी मासिके आहेत. यात मला बालविकाससाठी लिहायला सांगितले गेले. मला आनंदच झाला. गेली पाच-सहा वर्षे मी हे काम करत आहे. ही मासिके, श्री सत्यसाई बाबा यांच्या प्रेरणेने गेली चाळीस वर्षे निघतात. मात्र ती सर्वत्र उपलब्ध नसतात म्हणून श्री सुनीलजी सामंत व त्यांच्या ई-साहित्य प्रतिष्ठान टीम द्वारे पुस्तक रूपाने महाजालांकित व्हावीत असे सुनीलजींनी सुचविले. त्यांच्यामुळेच या कथांना चिर-जीवन मिळत आहे.

मी या कथा लिहिल्या असे म्हणणेही पूर्णपणे सत्य नाही. या कथांचे स्रोत विविध आहेत. कधी एखादे पुस्तक, कधी वर्तमानपत्रातील बातमी, कात्रणे, कुठे ऐकलेले भाषण, तर कधी एखादी पाहिलेली फिल्म! एखाद्या कोणत्या ठिकाणी असे बीज मिळेल की त्यातून मुलांना काही मूल्य नकळत शिकवता येईल, या वृत्तीने माझी शोधक नजर असायची व सतत असते। 6 वर्षे ते 15-16 वर्षे हा वयोगट डोळयांसमोर ठेवून मी लिहीत गेले.

या कथांमध्ये मीच इतकी गुंतून गेले की हे सर्व लिहितांना मी कधी मनातच हसले किंवा कधी अश्रूही तरळले. आगगाडीतून जातांना आपला एकच राहिलेला बूट फेकणाऱ्या मुलाची गोष्ट वाचून माझा कंठ आत्ताही दाटून येतो. जावेदच्या कथेत शेवटी होणाऱ्या उलगड्यात मला आजही अनामिक समाधान मिळते! ऊधमसिंहाबद्दल लिहितांना तेव्हाही माझी लेखणी थरथरली! फाशी गेलेल्या त्या कोवळया तरुणासाठी आजही डोळे भरून येतात. रत्ना या नोकराला क्षमा मिळाली या शेवटात मनाला शांती मिळते. अब्बुखां च्या बकरीला उचलून कुरवाळावेसे वाटते..... मनाच्या अशा किती प्रतिक्रिया लिहू? ...खूप लिहिता येईल, पण थांबायला हवेच.

या गोष्टी मुलांना 'सांगितल्या' तर त्या अधिक आवडतात असा अनुभव आहे. थोडे नाट्यीकरण, हावभाव करून सांगता आले तर फारच छान! हल्लीची समजदार मुले कॉम्प्यूटर वरही वाचू शकतील! पालकांनी या गोष्टी स्वतःही वाचाव्यात; कारण शाळा-कॉलेज सोडल्यावर आपण फार कमी वाचतो. पालकांनी जर अंगी गुण बाणवले तर मुलंही त्यांचं अनुकरण करतील. या पुस्तकामुळे मोठ्यांना दिशा मिळेल, मुलांना अधिक चांगलं वाढवता येईल, असा विश्वास मला वाटतो.

श्री सत्यसाई बालविकास वर्ग ठिकठिकाणी चालू असतात, अगदी परदेशातसुद्धा! पुण्या-मुंबईत तर विविध ठिकाणी आहेत. शोध घेतला तर मिळतील. वरील वयोगटासाठी, यात व्यक्तिमत्त्व विकासाचा प्रयत्न व मूल्याधारित शिक्षण दिले जाते. अशा वर्गात पालक गुरु म्हणूनही सहभागी होऊ शकतात. त्यासाठी प्रशिक्षणही दिले जाते.

तुम्हाला हया कथा कशा वाटल्या, मुलांना म्हणजे मुलींनाही कशा वाटल्या, तुमचे अनुभव कळविले तर आनंद होईल.

श्री सुनील सामंत व ई-साहित्य प्रतिष्ठानचे आभार मानून थांबते.

------संगीता जोशी

# <u>जलसाक्षरता</u>

मित्रांनो, आत्ताच कुठे पावसाळा संपला; तर आता दुष्काळाची ओरड सुरू झाली आहे; शहरातून पाणी-कपातीच्या गोष्टी होऊ लागल्या आहेत. पाणी नाही तर काय? अशी भीती सर्वांना वाटत आहे. ‘पाणी पेटू लागले आहे! ’ असंही म्हणतात.

सर्वांना पाणी समानरित्या मिळालं पाहिजे; पाणी मिळणं हा प्रत्येकाचा हक्क आहे हे तत्त्व कोणीही मान्यच करेल. पण प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होतांना दिसत नाही. शिवाय आणखी एक अडचण आहे, की पाण्याची ‘‘किंमत’’ लोकांना अजून कळलेली नाही! पाणी वाया न घालवणं, ते वाचवण्याचा प्रयत्न न करणं ही साधी गोष्ट आजही लोकांना समजलेली नाही. त्यासाठी त्यांना अडाणीच म्हणावं लागेल! कुठल्याही परिस्थितीत पाणी वाचवलंच पाहिजे, जपून वापरलं पाहिजे, त्याची नासाडी होता कामा नये, हे माहीत करून घेणं व **<u>त्याप्रमाणे वागणं</u>** यालाच जलसाक्षरता म्हणतात. आज ही काळाची गरज आहे.

तुम्हाला माहीत आहे का? पृथ्वीवर किती पाणी आहे? तुम्ही समुद्राची नावं पटापट सांगाल. पण हे पाणी आपल्याला प्रत्यक्ष उपयोगी आहे का? याच खाऱ्या पाण्याची सूर्याच्या उष्णतेमुळे वाफ होऊन ढग तयार होतात व पाऊस पडून गोडं पाणी आपल्याला मिळतं; हे निसर्गचक्र तुम्ही शिकला आहात. म्हणजे आपली पाण्याची गरज केवळ निसर्गच भागवू शकतो, हे समजावून घ्यायला हवं. असं पहा, पृथ्वीवर जे एकूण पाणी आहे त्यापैकी 97 टक्के पाणी हे खारे पाणी आहे. उरलेले केवळ 3 टक्के पाणी गोडे पाणी आहे. त्या 3 पैकी 2 टक्के पाणी बर्फाच्या स्वरूपात आहे व केवळ एक टक्का पाणी पृथ्वीवरील सर्व प्राणी, वनस्पती वा सजीव सृष्टी यासाठी उपलब्ध आहे! ! यातच जगातील माणसं, वृक्ष, शेती इ. सर्व आले. मग आता कळलं का, की पाणी किती थोडं आहे? सोपं करून सांगायचं तर पृथ्वीवर 100 बाटल्या एकूण पाणी मानलं, तर फक्त एकच बाटली पाण्यात आपल्याला (जगातील) सर्व व्यवहार करायचे आहेत.

आपण पाणी किती काटकसरीने वापरायला पाहिजे हे आता तुम्हाला कळलं असेल. खूप लोक हे जाणतात व इतरांना समजविण्याचा प्रयत्न करतात. राजेंद्र सिंह यांनी राजस्थानात खूप काम केलं आहे. त्यांनी लोकांच्याच मदतीनं बंधारे बांधून राजस्थानच्या रखरखीत वाळवंटाचा काहीसा कायापालट केला आहे. त्यांना जागतिक स्तरावरचे काही पुरस्कारही मिळाले आहेत. आपल्याकडे गेले 2/3 वर्षे अभिनेता आमिरखान हे काम जातीने करत आहे; हे तुम्ही टीव्ही वर पाहिलेच असेल. महाराष्ट्र सरकारही यात सहभागी आहे. नाना पाटेकर व मकरंद अनासपुरे हे अभिनेतेही या मोहिमेत मागे नाहीत. आपल्या लोकप्रियतेचा फायदा घेऊन ते लोकांना जलसाक्षर बनवू पाहात आहेत.

या सर्वांच्या आधी लोकांना पाणी मिळवून देणं, बंधारे बांधायला उद्युक्त करणं; पाणी अडवायला व जिरवायला शिकवणं हे काम एक व्यक्ती करत होती, ते म्हणजे कै. विलासराव साळुंखे. स्वतः इंजीनियर. उच्च शिक्षित. स्वतःचा उत्तम चालणारा व्यवसाय सोडून खेडोपाडी जाऊन त्यांनी लोकांना जलसाक्षर केलं. ‘भगीरथाचे वारस’ हे त्यांच्या जीवनावर लिहिलेलं पुस्तक मिळालं तर जरूर वाचा. (ले. वीणा गवाणकर )

मित्रांनो, प्रयत्न होताहेत पण फार कमी पडत आहेत. तुम्ही देखील हे काम जाता जाता करू शकता. स्वतः पाणी वाचवा व इतरांना त्याबद्दल माहिती द्या. कारण आपल्याकडे सुशिक्षित म्हटले जाणारे लोकही जलसाक्षर नसतात, हे आढळून येते. सर्वजण जलसाक्षर होऊया.

तुमचा विश्वास बसणार नाही पण आपले बाबासुध्दा पाणी वाचविण्याबद्दल सांगत असत. ते जगण्याचे एक मूल्य आहे!

# सँटा क्लॉज

मित्रांनो, 2017 संपून 2018 साल सुरू झालं; तुम्हां सर्वांना नवीन वर्षाच्या खूप शुभेच्छा. 25 ते 31 डिसेंबर या ख्रिसमस सणाची मजाही तुम्ही अनुभवलीच असेल. प्रशांति निलयम मधेही हा सण मोठ्या उत्साहानं साजरा होतो. स्वामी पहिल्या मजल्यावरच्या व्हरांड्यात उभे राहून सर्वांना आशिर्वाद देत असत. परदेशातून आलेले सर्व ख्रिश्चन बांधव मेणबत्त्या पेटवून प्रकाशाचा संदेश देतात, ही प्रथा आजही चालू आहे.

लहान मुलांना ख्रिसमस सणाचं आकर्षण असतं ते जास्त करून सँटा क्लॉज मुळे. सँटा क्लॉज ख्रिसमसच्या पूर्वसंध्येला मुलांसाठी अनपेक्षित भेटवस्तू आणून देतो ब मुलं आनंदून जातात. या सँटाक्लॉज बद्दल आपण जाणून घेऊ या.

तिसऱ्या व चौथ्या शतकात निकोलस (जन्म इ.स.280) नावाचा एक श्रीमंत मनुष्य आशिया मायनर म्हणजे आत्ताच्या टर्की देशात मायरा या गावी राहत होता. तो खूप दयाळू व करुणा बाळगणारा माणूस होता. एक दिवस तो फिरायला जात असतांना एका घरातून त्याने लहान मुलीच्या रडण्याचा आवाज ऐकला. ती आपल्या वडिलांना सांगत होती, ‘पपा, आईची तब्येत फारच बिघडली आहे. आपल्याकडे औषध आणायला व अन्नासाठीही पैसे नाहीत; आता काय करायचं? ’

वडील म्हणतात, ‘रडू नकोस, बाळा. तो येशू फार दयाळू आहे; तो आपल्याला नक्की मदत करेल.’

हा संवाद निकोलसच्या कानावर पडला. तो परत घरी गेला. पटकन् त्याने जरूरीच्या वस्तू व चांदीची नाणी जवळ पडलेल्या मोज्यांमध्ये भरली व ते मोजे त्या मुलीच्या घराबाहेर लांबूनच ठेवून दिले. त्या मुलीला चाहूल लागल्यामुळे तिने ते दार उघडून घेतले व आनंदून वडिलांना दाखविले. वडील म्हणाले, ‘बघ; मी तुला म्हणालो होतो नं, परमेश्वर दयाळू आहे; तो आपल्याला मदत करेल,म्हणून? ’ ही घटना ऐकून आजूबाजूचे रहिवासीही आपापल्या

घराबाहेर मोजे टांगून ठेवू लागले. निकोलस ने कोणालाच निराश केले नाही. पहिल्यांदा हा उदार माणूस कोण हे लोकांना कळले नाही; पण नंतर त्यांना त्याच्याबद्दल माहिती मिळाली व ते त्याला संत निकोलस म्हणू लागले. पुढे त्याच्या नावाचा अपभ्रंश होऊन सँटा क्लॉज हे नाव पडले.

सँटा क्लॉजच्या लोककथा युरोप-अमेरिकेपर्यंत पोहोचायला मात्र 19 वे शतक उजाडले. क्लेमेंट क्लार्क मूर या एका अमेरिकन कवीने त्याचे वर्णन करणारी मोठी कविता लिहिली. जिंगल बेल्स. ती खूप लोकप्रिय झाली. 1881 मध्ये थॉमस नास्ट या चित्रकाराने या कवितेतील वर्णनानुसार सँटा क्लॉज चे चित्र रेखाटले. त्यात सँटा क्लॉज च्या अंगावर पांढरी फर असलेला तांबडा ओव्हरकोट दाखवला होता. व तो बर्फाळ प्रदेशातून आठ रेनडियर च्या गाडीत बसून येतो. तो येशूचा दूत (देवदूत) असून तो ख्रिसमसच्या पूर्वसंध्येला सर्व मुलांसाठी भेटवस्तू घेऊन येतो. सगळ्यांना आनंद वाटतो. अशा तऱ्हेने तो सर्वांचा मित्र आहे. हा वेष व हे रूप त्या कवितेने सँटाला दिले आहे.

मुलांनो, केवळ ख्रिश्चनच नव्हे तर सर्वधर्मीय लोक ख्रिसमस सण उत्साहात साजरा करतात. सर्व मुले 24 डिसेंबरच्या रात्री दाराला मोजा बांधून गिफ्टची वाट पाहतात. त्यांचे पालक त्यात गिफ्ट ठेवतात; व मुले आनंदित होतात.

मित्रांनो सँटा क्लॉज खराच होता की नाही असा प्रश्न तुम्हाला पडेल. पण लक्षात घ्या, एक व्यक्ती यापेक्षा, त्याकडे एक वृत्ती म्हणून पाहायला हवे. निकोलसकडे दया, करुणा व औदार्य हे गुण होते. आपली संपत्ती त्याने निरपेक्ष भावनेने गरजूंना वाटून टाकली. दुःखी लोकांना त्यातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच त्याला संतपद लोकांनी बहाल केले. स्वामी आणि येशू यांची शिकवण एकच आहे; पटले ना तुम्हाला? ...नवनर्षाच्या शुभेच्छा!

# धन

आज एका कवितेचा गोषवारा सांगावासा वाटतो आहे. कवीचं नाव? .....ते नंतर सांगते.

कवितेत एक निर्धन, वयस्क व्यक्ती आहे.. काळ खूप जुना ... पुरातन.. तो गरीब माणूस बिचारा रस्तोरस्ती फिरत आहे. कुणी काही देईल का? ..काही धान्य .. काही पैसे... काही जुने-पाने कपडे.....? मनात आशा आहे ...खांद्यावर झोळी घेऊन आणखी, दिसेल त्याची विनवणी करायला हवीय्....

पण हे काय? रस्त्यावर एकदम एवढी गडबड..ही धावपळ कशासाठी सुरू झालीय्? हे तर राजाचे शिपाई! हुकमी आवाजात ते रस्त्यावरच्या सगळयांना पांगवताहेत... सगळयांना सांगताहेत, बाजूला व्हा..रस्त्याच्या कडेला व्हा...कडेला जाऊन उभे रहा... राजेसाहेबांची स्वारी इकडून जाणार आहे...रस्ता मोकळा करा....

त्या गडबड-गोंधळात ह्या निर्धन..फाटक्या व्यक्तीवर जो तो खेकसतो आहे....ए।, चल हो बाजूला.... कुणीतरी त्याला ढकलून कडेला नेतं... लक्ष्मीच्या दराऱ्यापुढे लाचार निर्धनाचं काय चालणार ..?

बिचारा अंग चोरून कडेला जाऊन उभा राहतो..मनात येतं, निदान आज राजाला बघता तरी येईल...! वेडं मन म्हणतं, माझी ह्या राजाशी भेट झाली तर काय बहार येईल! मी त्याच्याकडून धन मागून घेईन.. माझं दारिद्र्य कायमचं नष्ट होऊन जाईल.... गरीबांच्या मनोरथांना कधी अंत असतो का?

तेव्हढ्यात.... दबक्या आवाजातली गडबड ऐकू आली... आले ।..आले..।तो पहा, रथ दिसतो आहे...

रथ दिसू लागला .. पांढऱ्या घोड्यांचा ..सोन्यानं मढवलेला.. आणि आत होता स्वत: राजा!! देखणा... तरणा... रुबाबदार... प्रजेचा स्वामी..

ह्या निर्धन माणसाच्या आशा पुन्हा पालवल्या... हा रथ जर माझ्याजवळ येऊन थांबला तर....? ..

अन् हे काय? खरोखरच राजाचा रथ येऊन थांबला.. त्याच्याच जवळ... आणि राजाने त्यालाच खूण केली. जवळ येण्याची. ... मनात कितीही कल्पना केली असली तरी प्रत्यक्षात अनपेक्षितपणे तसं घडल्यावर त्या निर्धन व्यक्तीला काही सुचेना... तो जागचा हलूही शकला नाही. विस्फारल्या डोळयांनी तो राजाकडे पाहातच राहिला...शेवटी राजा स्वत: रथावरून पायउतार झाला. त्या गरीब माणसाजवळ आला..

आ । हा।... काय सौंदर्य! केवढं लक्ष्मीचं तेज ... गरीब माणसाचे डोळे दिपले...राजा त्याच्यापुढे येऊन म्हणाला, बाबा, अहो बाबा, होय मी तुमच्याशीच बोलतोय... इकडे तिकडे काय पाहताय्? ..तुमच्याशीच बोलतोय् मी! मला सांगा, तुमच्या झोळीत काय आहे? मला द्या नं, काय असेल ते... जरा भूक लागलीय्!

काहीही चालेल...

अरे दैवा! ! गरीब माणूस मनात म्हणाला, मी काय समजत होतो, की राजाकडून मला काही मिळेल..हा तर उलटा न्याय झाला ... हाच माझ्याकडे काहीतरी मागतोय् ..!!

कल्पनांच्या भराऱ्या संपून मन एकदम ताळयावर आलं . जराशा तुच्छतेनंच गरीब माणसानं आपल्या झोळीतले चिमूटभरच धान्याचे दाणे, राजाच्या पसरलेल्या हातावर ठेवले. राजा हसून निघून गेला..... रथ दूर दूर गेला.....

हा निर्धन माणूस निराश मनाने घरी निघाला... घर कसलं! मोडकी-तोडकी झोपडी होती ती एक. नशिबाला दोष देत, हळहळत चालला होता बिचारा.....मनात म्हणत होता,

घरी पोहोचला.. बायकोनं विचारलं, काय भीक मिळाली? त्यानं झोळी तिच्यापुढे उपडी केली. ...आणि हे काय? या झोळीतल्या धान्यात हे काय चमकतंय्? अरेच्या! हे सोन्याचे कण? आणि ही मौल्यवान हिरे-माणकं? ... आनंदाश्चर्यानं त्या माणसानं ती धान्यातून वेचून बाजूला काढली...सगळी मिळून हातात घेतली. सगळं मिळून चिमूटभरच होतं ते धन! ..आत्ता त्या निर्धनाला अर्थ उलगडला... हिरे – माणकं पाहून झालेल्या आनंदाची जागा आता दु:खानं घेतली. पश्चात्तापाचे अश्रू त्याच्या डोळ्यातून वाहू लागले. अरेरे! ! मी फक्त चिमूटभरच धान्य का दिलं राजाच्या हातावर? सगळी झोळीच का नाही त्याच्या ओंजळीत रिकामी केली? किती करंटा मी! किती कंजूष! किती लोभी मी! जर माझ्याजवळचं सगळं धान्य मी दिलं असतं तर आज मलाही भरभरून मिळालं असतं....

चिमूटभर दिल्यानं चिमूटभरच मिळालं! !

अशी ही कविता! कोणाची आहे माहित आहे? भारतासाठी वाङ्मयाचं एकमेव नोबेल पारितोषिक ज्यांनी मिळवलं त्या पूज्य रवीन्द्रनाथ टागोर यांची..गीतांजली हा त्यांचा अनमोल काव्यसंग्रह! नोबेलविजेता. त्यातली ही कविता! तिचा हा गोषवारा... किंवा स्वैर भावानुवाद म्हणा हवं तर..

मला ही कविता फार आवडते. किती मार्मिकपणे जीवनाचं मोठं तत्त्वज्ञान कवीनं सांगितलंय्! जेवढं तुम्ही इतरांना द्याल, तेवढंच तुम्हाला मिळेल..! म्हणून स्वत:ला काही मिळण्याची अपेक्षा करण्यापूर्वी आपल्याला जे शक्य असेल ते आधी दुसऱ्याला दिलं पाहिजे..भले आपल्याजवळ थोडं का असेना, त्यातला काही हिस्सा आपण दान केलं पाहिजे..( हे फक्त पैशाबाबतच नाही... प्रेमही दिलं तरच मिळतं ..)

तुम्ही म्हणाल, आजच्या लाखो-कोटींच्या भ्रष्टाचाराच्या ह्या काळात ही कविता काय कामाची!! आपले नेते आज जे काही करत आहेत, ते तर याच्या विरुध्दच आहे! हो, कारण ते संस्कार विसरले आहेत.. ह्या कवितेतून सांगितला आहे तो संस्कार! आताच्या नेट संस्कारात हे बसत नाही. पण हे पुढे आलं पाहिजे.. सामान्य माणसाच्या मनात ते आहेच, ते जागं केलं पाहिजे...

टागोरांसारख्या कवीच्या शब्दांना काहीतरी तर अर्थ असलाच पाहिजे! तुम्हाला काय वाटतं? ?

# नमस्काराचे महत्त्व

ही एक सत्यकथा आहे. एकदा एका माध्यमिक शाळेत प्रसिद्ध व्याख्याते मुलांना मार्गदर्शनपर व्याख्यानासाठी गेले होते . त्यांनी अभ्यासातील अनेक गोष्टींबद्दल बऱ्याच सूचना केल्या. त्यानंतर सांगितले,की रोज आंघोळ झाल्यानंतर देवाला व आईवडिलांना नमस्कार करत जा. मग आपले काम करा. आईवडील हे आपले पहिले गुरु असतात. आपले स्वामीसुद्धा ही गोष्ट वारंवार सांगतात. प्रथम आई-वडिलांना वंदन करा. व्याख्यान संपले. सर्व विद्यार्थी व शिक्षकांना ते आवडले होते. व्याख्याते शिक्षकांशी बोलत होते. काही विद्यार्थी व विद्यार्थिनिसुद्धा आपले भाव प्रकट करत होते. व्याख्यात्यांचे लक्ष मुलींच्या एक्या घोळक्याकडे गेले. त्यातील एका मुलीला बाकीच्या सांगत होत्या, 'अग ऽ जा ना ; तूही सांग त्यांना काय सांगायचं ते' पाहुण्यांनी ताडले की असेच काहीतरी असणार ; त्या मुलीला माझ्याशी बोलायचे आहे पण तिचे धाडस होत नाहीए.

मग पाहुणे व्याख्यातेच त्या घोळक्याजवळ गेले व म्हणाले, 'बेटा, बोल तुला काय सांगायचे आहे ते न घाबरता सांग'

मग ती थोडी सावरली व बोलू लागली, 'सर, तुम्ही सांगितलं की आई-वडिलांना रोज नमस्कार करत जा; पण मी कसा काय करू? माझा बाप...सॉरी... माझे बडील व्यसनी आहेत. ते काहीच कमवत नाहीत . आई लोकांकडे कामं करून पैसे कमावते, तेही ते व्यसनासाठी घेतात. नाही दिले तर मारतात. आम्हालाही-भावाला व मला- मारतात. खायची तोंडं वाढली म्हणून. अशा वडिलांना मी कसा काय नमस्कार करू? आईला करेन कारण तीच आमच्यासाठी कष्ट करतेय. बाबांनाही पोसतेय. पण त्यांना नमस्कार करावासाच वाटत नाही.'

व्याख्याते म्हणाले ' बाळा मी काय सांगतो ते नीट ऐक. ते कसेही असले तरी तुझे बाबा आहेत. याच भावनेने तू त्यांना न चुकता नमस्कार कर. आणि मग बघ काय होते ते. ते रागावले तरी नमस्काराचा तुझा नेम चुकवू नकोस.' मुलगी 'बरं' म्हणाली.

पहिल्याच सकाळी तिने नमस्कार केला तेव्हा बापाने तिला जोरात ढकलून दिले. ‘हा काय तमाशा आहे? ’ असे खेकसले.दुसऱ्या दिवशीही असेच शिव्या देऊन ढकलले व मारले. आई मधे पडली. ‘आवो, साळंत शिकवलंय त्यान्ली, आई-बापांच्या पाया पडायला. पडू दे ना. तुमचं काय जातंय.’

असं काही दिवस चालल्यावर वडील गप्प राहून नमस्कार घेऊ लागले. पण चिडचिड दाखवायचे. काही महिन्यांनी त्यांचा मूड जरा शांत झाला. एके दिवशी तिने नमस्कार केला तेव्हा त्यांच्या डोळयात पाणी आलं. ते म्हणाले ‘मी तुमच्याशी इतका वाईट वागतो मारतो, तुम्हाला छळतो तरी का माझ्या पाया पडतीस? ’

ती उत्तरली, ‘बाबा, तुम्ही कसेही असलात तरी आमचे जन्मदाते आहात. तुमचं आमच्यावर आईवर प्रेम असणारच, तुमच्या व्यसनाखाली ते दबून गेलंय. पण कधीतरी तुम्ही आमच्यात यालंच ना! ‘

या व अशा आणखी संवादानंतर बापानं पोरीला पोटाशी धरलं अन् शपथ घेतली ‘ आजपासून दारू बंद.तुमची शप्पथ’ असे म्हटले व त्याच दिवसापासून घरातलं दुःख बाहेर गेलं व सुख आत आलं.

मुलांनो, सांगायचं इतकंच की त्या मुलीनं आपल् नमस्काराचा नियम पाळला व सारं घर बदलून गेलं. नम्रपणात व मोठ्यांच्या आशिर्वादात ताकद असते.

या मुलीसारखं व्यसनी घर कुणालाही न मिळो; पण देवाला व मातापित्यांना नेहमी सकाळी नमस्कार करा. तुमचं काम नेहमी फत्ते होईल.

# संस्कारांची गरज

मित्रांनो, पुढील उदाहरणे वाचा--

1. इटलीचा प्रसिद्ध कलाकार मायकेल अँजेलो हा उत्कृष्ट शिल्पकार होता. त्याला एकदा विचारण्यात आलं, 'तू साध्या पाषाणातून इतक्या सुंदर मूर्ती कशा घडवतोस? '

त्याने उत्तर दिलं, 'मूर्ती मी घडवत नाही; ती त्या पाषाणात असतेच. मी फक्त तिच्या भोवती असलेला अनावश्यक पाषाणाचा भाग छिन्नी ने काढून टाकतो, आणि मूर्ती बाहेर येते! '

2. कोळसा आणि हिरा हे एकमेकांचे सख्खे भाऊ आहेत ही माहिती आता जुनी झाली आहे म्हणजे सर्वांनाच माहीत आहे.दोन्ही कार्बन या मूलद्रव्याची रूपे आहेत.दोन्ही एकाच खाणीत सापडतात. हिऱ्याचा दगड कोळशासारखाच दिसतो. जाणकार नजरच त्याला वेगळं काढू शकते. अशा दगडाला नंतर मशीनवर विविध कोनातून कापलं जातं.घासलं जातं. तेव्हा त्याचे पृष्ठभाग चमकू लागतात. त्याला तेज येतं.

3. उसापासून साखर बनविण्याचे अनेक कारखाने महाराष्ट्रात आहेत. उसावर बऱ्याच प्रक्रिया केल्या जातात. शेवटी स्फटिकरूपी साखर मिळते. पण तिचा रंग पिवळा असतो. ग्राहकाला पांढरी स्वच्छ साखर हवी असते. तशा साखरेलाच भाव चांगला मिळतो. मग तिच्यावर शेवटी सल्फर-डाय-ऑक्साईड चा प्रयोग केला जातो व साखर शुभ्र होते.

4. तांबे हा धातू आपल्या परिचयाचा आहे. 78 टक्के तांबे व 22 टक्के टिन या धातूंचे मिश्रण करून जो धातू तयार होतो, त्याला 'बेल-मेटल' म्हणतात. त्यापासून विविध प्रकारच्या घंटा बनविल्या जातात; ज्यांचा उपयोग चर्च पासून ते शाळेसाठी व भजनाच्या झांजांसाठी केला जातो. मंजूळ आवाजासाठी तांब्याला यातून जावं लागतं.

5. भाकरी-पोळी भात इ. आपलं नित्य-अन्न (स्टेपल फूड)आहे. पण गहू, ज्वारी, तांदूळ बाजारातून आणून तसेच फक्की मारून आपण खाऊ शकत नाही. त्यापूर्वी स्वच्छ करणे(निवडणे), दळणे, मळणे व शिजवणे वा भाजणे इ. आवश्यकते नुसार वेगवेगळया क्रिया त्यावर कराव्या लागतात. तेव्हा कुठे ते शरीराला स्वीकार्य होते व पचन होऊ शकते.

ही पाच उदाहरणे आपल्या अगदी परिचयाची आहेत. ही सर्व संस्कारांची उदाहरणे आहेत. आपल्याला मुळात उपलब्ध असलेली गोष्ट जशीच्या तशी उपयोगात क्वचितच आणता येते. आपल्याला त्यात काही बदल अपेक्षित असतात. बदलानंतरच ती आपल्याला उपयुक्त ठरते; आपल्याला आवडते; आपल्याला सुख देऊ शकते. जसे, पाषाण आवडू शकत नाही;पण त्यातून निघालेली मूर्ती सौंदर्यानुभूती देते, कधी वंदन करावेसे वाटणारे भाव जागृत करते. अशाप्रकारे आपल्याला भावनिक अनुभूतीतून समाधान देते.

हिऱ्याच्या ठिकाणी अंगीभूत गुण आहेत पण ते प्रकट होण्याकरता त्यावर संस्कार करावे लागतात,हे उघड आहे. अंगीभूत गुण नसेल तर मंजूळ आवाजाकरिता धातूंचे मिश्रण करावे लागते. प्रक्रियेतून नसलेला गुणही आणता येतो. साखरेचे रंगरूप बदलून तिची किंमत वाढवता येते.मलिनता निघण्यासाठी तिच्यावरही संस्कार करावे लागतात. मग ती ग्राहकाला म्हणजे समाजाला हवीशी वाटते.

अन्न पचण्यायोग्य करूनच आपण सेवन करतो व धष्टपुष्ट, निरोगी होतो.तसाच आपला समाज निरोगी व पुष्ट होण्यासाठी आपल्यावरही संस्कार होणे गरजेचे आहे.

माणूस जन्मतो तसाच तो पुढेही राहिला तर त्याचा त्याच्या कुटुंबाला समाजाला काही उपयोग होणार नाही.

उपजत गुणांना उजाळा देण्यासाठी, नसलेले गुण रुजविण्यासाठी, आजूबाजूच्या इतरांना स्वीकार्य होण्यासाठी, समाजाला व देशाला पुढे नेण्यासाठी, स्वतःचे व्यक्तिमत्त्व तेजस्वी होण्यासाठी, दुसऱ्यांना आनंद देण्याची जाणीव होण्यासाठी एखाद्या व्यक्तीत जे बदल घडविले पाहिजेत त्यांना संस्कार म्हणायचं. माणसानं अधिक चांगला माणूस होण्यासाठी स्वतःत बदल करायला हवेत. असं होणारं परिवर्तन म्हणजे संस्कार.

संस्कार हे आई-वडीलच करतात हे अर्धसत्य आहे. संस्कार लहान वयात आई-वडिलांचे निरीक्षण करून मूल स्वतःच करून घेत असते. समोर बसवून शिकविण्याची ती गोष्ट नाही. प्रथम पालक, नंतर शाळा, शिक्षक, पुढे मित्रमैत्रिणी या सर्वांच्या निरीक्षणातून व्यक्ती घडत जात असते. म्हणजे व्यक्तीत बदल घडत असतात.त्यामुळे पोषक वातावरणाला महत्त्व आहे.

थोडक्यात, व्यक्तीत सतत बदल होत राहणं ही न थांबणारी प्रक्रिया आहे. अनुकूल व पॉझिटिव्ह बदल म्हणजे संस्कार. विचारी व्यक्ती स्वतःच स्वतःमध्ये चांगल्यासाठी बदल घडवून आणू शकते, अशी उदाहरणेही आहेत. महात्मा गांधी हे एक मोठे उदाहरण डोळयांसमोर येते; नाही का? अलीकडील उदाहरण द्यायचे तर अनुराधा प्रभुदेसाई आठवतात. निरीक्षणानेच त्यांनी स्वतःमध्ये बदल घडविला व आज त्या जवानांच्या भगिनी झाल्या आहेत.

संस्कार हे स्वतःच्या जीवनात आनंद निर्माण करण्यासाठी व समाजात तो आनंद वाटून टाकण्यासाठी अत्यंत गरजेचे आहेत.

# 'आहे रे' आणि 'नाही रे'

मित्रांनो, तुम्हाला चित्रपट बघायला आवडतं ना? पण हल्ली लघुपटांचा जमाना आहे. याचं एक कारण, ते बनवायला खर्च कमी येतो. जीवन हे छोट्या छोट्या घटनांचंच बनलेलं असतं. अशा छोट्या पण प्रभावी घटनांवर लघुपट करून त्यातून खूप काही सांगितलं जातं. क्वचित काही संदेश दिला जातो.

नुकताच असा एक लघुपट मी पाहिला. तो असा सुरू होतो—एक रेल्वे-स्टेशन आहे. स्टेशनवर खूप गर्दी आहे. प्लॅटफॉर्म वर धावाधाव चालू आहे; पण माणसे दिसत नाहीत. कॅमेरा सर्वांच्या पायांवर आहे. घाईघाईने ते पाय (लोक) इकडे तिकडे जात आहेत. नंतर कॅमेरा दोन पायांना फॉलो करतो. त्या पायांमधे फाटक्या सपाता आहेत. पँटही फाटलेली. कॅमेरा हळूहळू वर जातो. तो एक 13-14 वर्षांचा गरीब मुलगा आहे. त्याच्या पायात जुन्या, झिजलेल्या रबरी सपाता आहेत. चालता चालता त्याच्या सपातांचा रबरी पट्टा आता तुटला आहे. तो वाकून चप्पल हातात घेतो. मग प्लॅटफॉर्मवर एका खांबाजवळ बसतो. पट्टा पुन्हा बसवता येतो का, प्रयत्न करत असतो.

तेवढ्यात तिघांचं एक कुटुंब येतं. आई-वडील व मुलगा. त्या मुलाच्या पायात नवे-कोरे शूज आहेत. गरीब मुलाचं लक्ष फक्त त्याच्या बूटांकडेच जातं. तो मुलगाही या मुलाच्याच वयाचा आहे. त्याला आपल्या नव्या बुटांची खूप काळजी असते. सारखा आपला रुमाल काढून तो बूट पुसत राहतो. गरीब मुलगा हे सारं पाहात असतो. ते कुटुंब एका बाकावर बसतं. गाडीची वाट पाहात. गरीब मुलाचं सगळं लक्ष त्या मुलाच्या कृतीवर आहे. त्याची तुटकी चप्पल त्याच्या हातातच आहे.कदाचित तो मनात विचार करत असावा, हा मुलगा किती भाग्यवान आहे! त्याला त्याचे आई-वडील हवं ते आणून देत असतील....

इतक्यात ट्रेन येते. सगळीकडे पुन्हा गडबड! गाडी थांबते. दरवाजे मोठे असूनही बेशिस्तीमुळे दरवाजातून सर्व एकदम घुसू लागतात. ते कुटुंबही चढतं. पण गर्दीमुळे त्या मुलाचा एक बूट पायातून निसटतो आणि प्लॅटफॉर्मवर पडतो. गर्दी इतकी आहे की बूट उचलण्यासाठी मुलगा पुन्हा खाली उतरूही शकत नाही व शिट्टी देऊन गाडीही निघालेली असते. हा गरीब मुलगा

हे सगळं बघत आहे. तो धावत धावत त्या बुटापाशी जातो. बूट उचलून क्षणभरच त्याकडे लालसेनं बघतो. पण नंतर लगेच गाडीबरोबर धावायला लागतो. त्या मुलाला बूट देण्यासाठी. ट्रेनमधला मुलगा याला पाहून हात लांब बाहेर काढून बूट घेण्यासाठी सज्ज राहतो.पण...

आता गाडीने वेग घेतला आहे...प्लॅटफॉर्मही संपत आला..आता कसा बूट परत मिळणार? तेव्हा गाडीतील मुलगा काय करतो? आपल्या पायातला दुसरा बूटही काढून खाली फेकून देतो, या गरीब मुलाच्या दिशेने! त्याला तरी दोन्ही बूट मिळू दे. चांगले बूट त्याच्यापाशी नसतीलच. हे मिळाले तर त्याला आनंदच होईल. असा विचार त्या गाडीतल्या मुलाने केला असावा. गरीब मुलगा धापा टाकत उभा राहतो. कारण प्लॅटफॉर्मच संपला आहे. तो पाहतो की गाडीतल्या त्या मुलाने दुसरा बूटही फेकून दिला आहे. हा मुलगा तो बूट उचलून घेतो. किंचितसं हसतो; आणि तिथेच हा लघुचित्रपट संपतो.

मित्रांनो हा चित्रपट जेमतेम चार मिनिटांचा आहे. पण किती अर्थपूर्ण आहे ना! यातून दिग्दर्शक काही संदेश देऊ इच्छित आहे. तसं पाहायला गेलं, तर समाजात फक्त दोन वर्ग आहेत. एक 'आहे रे' वर्ग व दुसरा 'नाही रे' वर्ग. एका वर्गाकडे जीवनात लागणारं सर्वकाही आहे. पण दुसरा वर्ग मात्र वंचित आहे. तो गरीबीत कसेबसे जगतो आहे.

हा गरीब मुलगा ज्याच्याजवळ धड सपाता सुद्धा नाहीत, तो पडलेला बूट पाहून प्रथम मोहित होतो; पण लगेच तो मोह सोडून प्रामाणिकपणे बूट देण्यासाठी धावतो. हा <u>प्रामाणिकपणा</u> महत्त्वाचा आहे. तसेच ट्रेनमधला तो मुलगा आपला दुसरा बूटही या गरीब मुलाकडे फेकून देतो. गरीब मुलगा आपल्याला बूट परत देण्यासाठी धावत येत होता, हे पाहून त्याला मनात <u>कृतज्ञता</u> वाटत असली पाहिजे. पण ते शक्य न झाल्यामुळे, दोन्ही बूट त्याला तरी मिळू देत असा विचार त्याने केला. बूट मिळाल्यावर त्या गरीब, वंचित मुलाला आनंद होईल. हा विचार त्या मुलाने केला असे आपल्याला कळते.

मित्रांनो, खूप शिकण्यासारखे आहे ना या चार मिनिटांच्या गोष्टीतून? प्रामाणिकपणा हे महत्त्वाचे मूल्य आहे. हा गुण प्रत्येकाने जपलाच पाहिजे. आणखी एक, दुसऱ्याला आनंद देण्यातच खरा आनंद आहे. तुम्हाला जेव्हा अशी एखादी संधी मिळेल तेव्हा असा आनंद

मिळविण्याचा प्रयत्न करून पाहा. वंचित वर्ग वंचित राहू नये यासाठी आपणच काहीतरी केले पाहिजे, ही जाणीव कायम मनात असू द्या.

दुसरे, बेशिस्तीने वागले तर जीवनात नुकसानच होते. गाडीत चढतांना लोक रांगेत चढले तर असा गोंधळ होणार नाही. पटते ना तुम्हाला?

# अब्बू खां ची बकरी

मित्रांनो, तुम्हाला आवडेल अशी ही एक गोष्ट आहे. आपल्या देशाचे रक्षण करणारा हिमालय पर्वत आपल्या उत्तरेस पसरलेला आहे. जगातले सर्वात उंच शिखर, एव्हरेस्ट हे त्याचेच एक शिखर आहे. हिमालयाच्या कुशीत वेगवेगळया उंचीवर छोट्या छोट्या वस्त्या आहेत. अशाच एका वस्तीत म्हातारा अब्बू खां रहात होता.एकटाच होता. त्यामुळे एखादी बकरी पाळायचा. तिला जीव लावायचा. तिला चरायला नेणे, संध्याकाळपर्यंत घरी आणणे, मग बांधून ठेवणे यात दिवस संपून जायचा. एकटेपणावर हा छान इलाज होता. पण त्याच्या सगळया बकऱ्या एकेक करून दोरी तोडून पळून जात. पारतंत्र्य कोणाला आवडते? प्राणी सुद्धा असेच असतात. त्यांनाही बंधन नको असते.

आधीची बकरी पळून गेली, तेव्हा अब्बूखां ने ठरवलं की आता बकरी पाळायचीच नाही. आणायची,तिच्यावर मुलासारखं प्रेम करायचं, आणि ती गेली की पुन्हा दुःखी व्हायचं! त्यापेक्षा नकोच ते. पण एकटेपणा माणसाला खायला उठतो. एक दिवस अब्बू खां ने बाजारात एक सुंदर बकरी बघितली. वयाने अगदीच लहान होती. पांढरा स्वच्छ रंग, लांब केस, दोन छोटी शिंगे आणि निरागस डोळे! त्याचा निश्चय तो विसरून गेला आणि बकरी घरी घेऊन आला. तिचे नाव त्याने 'चांदणी' ठेवले. अब्बू खां तिच्यावर खूप प्रेम करू लागला. तिच्याशी तो बोलत रहायचा. कुरवाळायचा. तिचे पापेसुद्धा घ्यायचा. तिच्या गळयात त्याने पहिल्यापासूनच त्याने दोरी बांधली होती. पण ती खूप लांब होती. चांदणीला अंगणभर फिरता यायचे. ती खूष होती.

दुसऱ्या अनेक बकऱ्या पहाडावर खुल्या फिरायच्या, ते ती पाहात होती. बरेच महिने गेले. एकदा तिच्या मनात आले, ही दोरी नसती तर मी सुद्धा पहाडावर हिंडू शकले असते. पहाडावरचे वाऱ्यावर डुलणारे गवत! किती चवदार असेल! !

एक दिवस पहाडामागून तिने सूर्य उगवलेला पाहिला. ते दृष्य, ती उडणारे पक्षी पाहून ती तर वेडीच झाली. मलासुद्धा असं मोकळं हिंडायचंय, पहाडावर जायचंय्.

संध्याकाळी अब्बूखां तिला गवत द्यायला आला, तेव्हा चांदणी म्हणाली, 'मलाही पहाडावर जायचंय्; त्या बकऱ्यांसारखं. सोड ना मला एकदाच …'

अब्बूखां तिला समजावत म्हणाला, 'नाही बेटा; तिथं मोठा लांडगा असतो. तो फार क्रूर आहे. मोठ्या बकऱ्यांनासुद्धा तो मारून टाकतो. त्यांचंही त्याच्यापुढे काही चालत नाही. तू तर अजून लहान आहेस. तो तुला खाऊन टाकील.'

चांदणी म्हणाली, 'कसा खाईल? मी लढेन ना त्याच्याशी! मला पण आहेत दोन शिंगं'

अब्बूखां सावध झाला. त्या दिवसापासून तो चांदणीला झोपडीत बांधू लागला.

एक दिवस सकाळी अब्बूखांने बाहेर जातांना झोपडीचे दार बंद केले; पण खिडकी उघडीच राहून गेली. चांदणीला संधीच हवी होती. गळ्यातल्या दोरीला हिसडे देऊन ती तोडण्यात तिला यश आले. ती पळून गेली पहाडाच्या दिशेने. तिच्या आनंदाला पारावार राहिला नाही.

सगळीकडे झुडूपे, हिरवेगार गवत, थंड वारा, कोवळे ऊन! कुठे ते एवढंसं अंगण, कुठे हे मोकळे आकाश; मोकळी हवा! चांदणी दिवसभर चरत, बागडत राहिली. स्वातंत्रयाची मजा अनुभवत राहिली. थोडी थकली. झऱ्याचं पाणी पिऊन बसून राहिली. संध्याकाळ केव्हा झाली तिला कळलंही नाही. सगळ्या आजुबाजूच्या बकऱ्या परत फिरल्या. हिमालयात अंधार झरझर पडतो व वाढतो. चांदणीला थोडी भीती वाटू लागली. सगळीकडे वातावरण स्तब्ध झाले. तिला

खालून अब्बूखांच्या हाका पुसटशा ऐकू आल्या. एकदा तिला वाटले परत जावे. पण स्वातंत्र्याचा मोह अधिक प्रभावी होता.

अंधार गडद झाला. तारे दिसायला लागले. ‘अरेच्या! हे दोन तारे तांबडे कसे? ’

चांदणीने ताडलं; ते तारे नव्हते. लांडग्याचे दोन डोळे होते ते. ते जवळ आले. ....आणखी जवळ! चांदणीला समजलं. आपली छोटी शिंगं खाली करून ती त्याच्यावर चाल करून गेली. तो जरासुद्धा हलला नाही. चांदणी त्याच्यावर तुटून पडली. त्यानं एकाच फटकाऱ्यात तिला घायाळ केलं. तिनं पुन्हा जिवाच्या करारावर हल्ल्याचा प्रयत्न केला; पण तीच रक्तानं माखली. झटापट करून ती थकली. निपचित पडली. तिच्यात त्राण उरलं नाही. लांडगा काही वेळात निघून गेला. बहुधा त्याला भूक नसावी

आजूबाजूचे पक्षी-छोटे लपलेले प्राणी सगळं पाहात होते. आपसात ते कुजबुजले,

‘अशी लांडग्याशी लढणारी बकरी पहिल्यांदाच पाहिली. पण बिचारी हरली’

काही म्हणाले ‘छे छे! ती हरली नाही; जिंकली. शूरपणा दाखवला तिनं’ .

‘ पण जिवाची किंमत द्यवी लागली. याला काय जिंकणं म्हणायचं? ’

दुसऱ्या दिवशी उजाडल्यावर अब्बू खां पहाडावर आला. चांदणीच्या शवावर डोकं ठेवून खूप रडला.

मित्रांनो, गोष्ट संपली. आपण काय बोध घ्यायचा? वडीलधाऱ्या माणसांचं ऐकणं हेच आपल्या हिताचं असतं. आपल्याला किशोर व नवतरुण वयात भलं-बुरं कळत नसतं. धोके दिसत नसतात. मोठी माणसं जे सांगतात, ते अनुभवातून आलेलं असतं. बंधनं ही आपल्या सुरक्षेसाठी, आपल्या भल्यासाठीच असतात. पूर्ण सक्षम झाल्याशिवाय स्वातंत्र्याचा योग्य उपयोग कोणी नीट

करू शकत नाही. उलट संकट ओढवून घेतलं जातं. बंधनातच एक प्रकारचं स्वातंत्र्य असतं. जग हे लांडग्यासारखं असत. तुम्ही निरागस असलात तरी ते दयाळू नसतं. तेच ही गोष्ट शिकवते.

आपल्या देशाचे तिसरे राष्ट्रपती डॉ. झाकिर हुसैन, हे या गोष्टीचे लेखक होते. आवडली ना गोष्ट?

# आपले सण

मित्रांनो, नुकताच श्रावण महिना सुरू झाला; आणि आपल्याकडे सणासुदीचे दिवस सुरू झाले. आपल्याकडील सण साजरे करण्यामागे काही वैज्ञानिक दृष्टिकोन असतो. तसेच काही मुल्येही त्यामागे दडलेली असतात. हे विचारात घेऊन आपण सणाचा अर्थ समजावून घेतला पाहिजे.

श्रावण सुरू झाला आणि नागपंचमीचा सण आला. 15 ऑगस्टला स्वातंत्र्यदिनाबरोबर आपण नागपंचमीही साजरी केली. नाग-साप म्हटलं की घाबरून त्याला मारायचं, असं करू नये. एक तर सर्वच साप विषारी नसतात. शिवाय साप शेतकऱ्याचा मित्र आहे. शेतात उंदीर पिकांची नासधूस करतात; उंदीर हे सापाचे अन्न आहे. त्यामुळे शेतात उंदरांची संख्या नियंत्रित करण्यासाठी साप मदतच करत असतात. तुम्ही अन्नसाखळी शिकलात तेव्हा हे तुम्हाला कळले असेलच.

श्रावण महिन्यातच पोळा हा बैलांचा सण येतो. यावेळेपर्यंत शेतातील बैलांची कामे संपलेली असतात. ट्रॅक्टर आले असले तरी गरीब शेतकऱ्यांना ते परवडत नाहीत. त्यांची सर्व भिस्त बैलांवरच असते. बैलांबाबत कृतज्ञता म्हणून पोळा साजरा केला जातो. त्यांना नटवून सजवून त्यांची मिरवणूक काढतात. त्या दिवशी बैलांसाठी मुद्दाम पुरणपोळी करतात. बैलांना तेल लावून मालिश करतात. इ. त्यांची बडदास्त ठेवतात.

श्रावणातील प्रत्येक सोमवारी शंकराच्या पिंडीवर दुधाचा अभिषेक करण्याची प्रथा आहे. यातून दधाचा त्याग शिकविला आहे. कारण पावसाळयात कफ-पित्त व वात यांचे संतुलन बिघडत असते. दूध त्याला अधिक कारण ठरते. म्हणून ही प्रथा आहे. वैज्ञानिक व डॉक्टर आजकाल

सांगतात, दूध व दुधाचे सर्व पदार्थ बाराही महिने आपण जेवणातून हद्दपार केले पाहिजेत. कारण त्यामुळे कोलेस्ट्रॉल वाढते व ते हृदयाला चांगले नाही.

दिवाळीत वसुबारसेला आपण गायीची पूजा करतो. गायीचे दूध त्यातल्या त्यात चांगले असते. आवश्यकच असेल तर गायीचे दूध चालेल. लहान मुलाला गायीचे दूध देतात. कारण त्याचे घटक साधारणतः आईच्या दुधासारखेच असतात. गायीचे शेण गोमूत्र इ. पदार्थही औषधी असतात. त्यांचा आयुर्वेदात उपयोग होतो. म्हणून आपण गायीचीही कृतज्ञता व्यक्त करतो.

आपल्या सणात प्राण्यांना अशाप्रकारे मान दिला जातो. हत्तीचे मुख गणपतीला असते व त्याचे पूजन होते. घोडा, मोर,वाघ इ. प्राणी-पक्षी, देव-देवतांची वाहने असतात. त्यांचीही पूजा केली जाते. प्राण्यांबरोबर वृक्षांचाही साणांच्या मागे विचार केलेला असतो. हरियाणात ‘हरियाली अमावास्या’ साजरी करतात. त्यावेळी नवीन वृक्ष-लागवड केली झाते. यावरून पर्यावरण संरक्षण व वृक्षांचे महत्त्व बिंबविले जाते. ग्लोबल वॉर्मिंग व प्रदूषण यावर वृक्षलागवड हाच एक उपाय आहे. आवळी-भोजन, वटपौर्णिमा हेही वृक्षांचेच सण आहेत. आपल्याकडे तुळस ही प्रत्येक दारात असे. कारण ती फार औषधी आहे. लहान सहान आजारात तुळशीचा काढा फार उपयुक्त असतो. तुळशी-विवाह हाही आपल्याकडे एक सण असतो.

काही सणांच्या मागे मानवी प्रकृती लक्षात घेतलेली असते. श्रावणापासून चार महिने मांसाहार न करण्याची प्रथा आहे. कारण त्यावेळी माणसाची पचनशक्ती क्षीण झालेली असते. खरे तर माणसाची पचनसंस्था निसर्गाने फक्त शाकाहारी जेवणासाठीच बनविलेली आहे. आता हे विज्ञानाने सिद्ध झाल्यामुळे खूप लोक शाकाहाराकडे वळू लागले आहेत.

थंडीत येणारी संक्रांत व त्यावेळी तिळगूळ वाटण्याची प्रथा यातही प्रकृतीची गरज पाहिली गेली आहे. थंडीत शरीरात जास्त उष्णतेची गरज असते म्हणूनच ही प्रथा अस्तित्वात आली.

रक्षाबंधन व भाऊबीज यासारखे सण भाऊ-बहिणीच्या नात्यात प्रेम टिकून रहावे हा संदेश देतात. दिवाळीच्या निमित्ताने होणारे दीपपूजन हे अंधाराचा नाश करण्याचा संदेश आहे. अंधार म्हणजे अज्ञान. अंधार म्हणजे जातीय भेदाभेद, अंधार म्हणजे आर्थिक दरी, गरीब-श्रीमंती हे भेद,

धर्म, पंथ संप्रदाय हे भेदाभेद; हा सर्व अंधार नष्ट करण्याची जबाबदारी आपली आहे. नुसती फटाके वाजवून प्रदूषण वाढविणारी दिवाळी आपल्याला नको.

या सगळया गोष्टी आपल्याला सण शिकवितात. म्हणून त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोण आपण बदलला पाहिजे.

# गायत्री मंत्र

मुलांनो, आज मी तुम्हाला गायत्री मंत्राबद्दल सांगणार आहे. ज्यांची मुंज केली जाते त्यांना गायत्री मंत्र शिकविला जातो. पण फक्त त्यांनीच गायत्री मंत्राचा जप करायचा, असा नियम नाही. उलट गायत्री मंत्राचा जप कोणीही करू शकतो. स्त्री-पुरुष, आबाल-वृद्ध असे सर्वजण हा जप करू शकतात. सकाळी, दुपारी व रात्री झोपण्यापूर्वी नियमित हा जप करावा.

ओम् भूर्भुवः स्वः तत्सवितुर् वरेण्यम्

भर्गो देवस्य धीमहि, धियोयोनः प्रचोदयात् ।।

असा हा मंत्र आहे. तुम्ही बालविकास वर्गात हा मंत्र शिकता, शिकलाही असाल.

गायत्री ही वेदांचीसुध्दा माता आहे. ती पंचमुखी आहे. पहिल्या मुखाचं नाव आहे, ओम. दुसऱ्या मुखाचं नाव—भूर्भुवः स्वः । तिसऱ्या मुखाचं नाव आहे, तत्सवितुर् वरेण्यम्. । चौथ्या मुखाचं नाव—भर्गो देवस्य धीमहि । व पाचव्या मुखाचं नाव, धियोयोनः प्रचोदयात् ।

मधल्या तीन मुखांना अनुक्रमे, सावित्री, गायत्री व सरस्वती असंही संबोधलं जातं.

तुम्ही गायत्री जप करत असाल तर वेदमंत्र म्हणायचीदेखील आवश्यकता नाही असं स्वामी सांगतात.

गायत्री मंत्राचं सामर्थ्य आपल्या कल्पनेपलीकडचे आहे. स्वामींचे एक विद्यार्थी, अमेय देशपांडे, त्यांचा अनुभव सांगतात. त्यांनी स्वामींच्या कॉलेजमध्येच MBA केलं. त्यात त्यांना सुवर्णपदक मिळणार होतं; तेही स्वामींच्या हस्ते!

पण एक अडचण होती. यापूर्वी घेतलेल्या पदवीचं ओरिजिनल सर्टिफिकेट त्यासाठी हवं होतं. ते काही अमेयजवळ नव्हतं. बेंगलोर युनिव्हर्सिटी कडून ते तातडीनं मिळणंही शक्य

नव्हतं. कारण मधे 7/8 वर्षे गेली होती. निदान पदवी परीक्षेचं मार्कशीट तरी हवं होतं. पण खूप शोधूनही ते सापडत नव्हतं. आता स्वामींच्या हातांनी सुवर्ण-पदक घेण्याची संधी हुकणार! याचंच अमेयला वाईट वाटत होतं.

अमेयना गायत्री मंत्राचं सामर्थ्य माहीत होतं. त्यांनी सतत गायत्री मंत्राचा जप एकाग्रतेनं सुरू केला. त्यावेळी त्यांनी अडचण काय आहे याचा विचारही मनात आणला नाही. फक्त गायत्रीवर मन केंद्रित केलं.

पुन्हा एकदा शोध घेण्यासाठी सगळे कप्पे शोधले, जे आधी दहा वेळा रिकामे करूनही काही सापडलं नव्हतं. पण त्याच एका कप्प्यात सर्वात खाली एक पाकिट दिसलं. घाईघाईनं अमेयनी ते उघडलं. आणि काय आश्चर्य? त्यात त्यांना हवी ती मार्क-लिस्ट होती!

शेवटी स्वामींच्या हस्ते सुवर्ण-पदक मिळण्याचा सुवर्णयोग जुळून आला होता. तोही गायत्री-मंत्राच्या श्रद्धापूर्वक जपाने!

असे आणखीही अनुभव तुम्हाला वाचायला मिळतील. मतितार्थ इतकाच, की गायत्रीमंत्र तुम्ही रोज, अगदी रोज, तीन वेळा म्हणाच. अंघोळ करतांना म्हणा. जेवणापूर्वी तिनदा, झोपण्यापूर्वी 108 वेळा... व हे सर्व जमलं नाही तर दिवसातून जमेल तेव्हा मनःपूर्वक म्हणा! तुम्हाला फायदाच होईल. अडचणी दूर होतील.

असं म्हणतात, संन्यासी व्यक्तीला संन्यास घेतल्यावर वेदपठण किंवा कुठल्याही मंत्राचे पठण करायला परवानगी नसते. याला अपवाद आहे फक्त गायत्री मंत्राचा! संन्यासीही या मंत्राचे पठण करू शकतात!

इतका सामर्थ्यशाली मंत्र आपल्याला माहीत असतांना आपण जर त्याचे पठण केले नाही तर आपणच आपले नुकसान करून घेऊ. गायत्री-पठणाचा नियम करा व तो पाळा.

# सुख आणि आनंद

शोभना सुखवस्तु, श्रीमंत स्त्री होती. तिच्याकडे सुंदर सुंदर कपडे,साड्या, दाग-दागिने, बंगला, गाड्या इ. सर्वकाही होते. नोकर-चाकर सगळी कामं करत होते. तिला काम नकोच असायचं. मैत्रिणी, पार्टी यात वेळ जायचा. पती बिझिनेस मधे गुंतलेले तर मुलं कॉलेज व आपापल्या विश्वात दंग! घरी एकटं बसून टी.व्ही. पाहायचा एवढाच उद्योग. त्याचाही आता कंटाळा आला होता. पार्टीतही मन रमत नव्हतं. तिला उदास वाटू लागलं होतं.कुणीतरी तिला डॉक्टरकडे जाण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे ती गेली. तिचे ऐकून घेऊन डॉक्टरांनी तिला मनोवैज्ञानिकांकडे (Psychiatrist) जाण्यासाठी चिठ्ठी दिली.

शोभना सायकिऍट्रिस्टकडे जाऊन त्यांना म्हणाली, 'डॉक्टर, माझ्याकडे सगळं काही आहे, जे मिळवावं असं सर्वांना वाटत असतं, ते सगळं! पण तरीही मन उदास राहतं. मैत्रिणी, पार्ट्या या कशातही आता रमू शकत नाही. काय करू? सुखच दुखतंय् असं झालं आहे.'

डॉक्टर म्हणाले 'यावरही औषधं आहेत;पण त्या आधी आमच्या आशाची कहाणी ऐका. आशा इथे आमच्या दवाखान्यात झाडू-पोछा करते.' असे म्हणून त्यांनी आशाला हाक मारली. 'आशा, जरा तुझी कहाणी सांग या बाईंना.'

आशाने सुरवात केली. (ती तिच्या अडाणी भाषेत बोलली, पण ते इथे सुधारून देत आहे.) 'माझा नवरा काही वर्षांपूर्वी मलेरियाने वारला. नंतर दुर्दैवाने माझा एकुलता एक मुलगा अपघातात गेला. मी फार दुःखी झाले; पण मेले नाही. जगण्यात राम वाटेनासा झाला. शिक्षण नाही, झाडू-पोछा,धुणं-भांड्याची कामं करू लागले. दुःखातही पोट खायला मागतंच.

'एके दिवशी मी कामावरून घरी येत होते; खूप पाऊस पडत होता. घराजवळच एक मांजराचं पिल्लू पावसात कुडकुडत होतं ते माझ्या पायाजवळ आलं. मग माझ्या मागे मागे आलं.अगदी झोपडीत शिरलं. मी बसले तर मला चिकटून बसलं. मी हाकललं तरी माझ्या उबेला

येऊन बसलं. मग मी त्याला फडक्यानं पुसलं. मी चहासाठी दूध आणलं होतं, त्यातलं थोडं त्याला घातलं. ते पिऊन ते माझ्या शेजारी उबेला झोपलं. ते बघून मला हसू आलं. मी त्याच्या अंगावरून हात फिरवला. त्याला हाकललं नाही.

'माझ्या मनात विचार आला, आज या मांजराच्या पिलामुळे माझ्या ओठावर कितीतरी दिवसांनी हसू फुटलं. याच्याबद्दल मला माया वाटली. खूप दिवसांनी खूप बरं वाटलं. हे तर मांजर आहे; असं जर मी माणसाला, गरजूंना, आजाऱ्यांना, दुःखी लोकांना माया दिली तर? तेव्हा तर जास्तच बरं वाटेल.ते माझ्याशी बोलतील. मलाही माया देतील...'

'मग मी ठरवलं आणि सरकारी इस्पितळात जायला लागले. तिथल्या रोग्यांची विचारपूस करू लागले. कोणाला काही हवं असलं तर आणून द्यायचं, नातेवाईक बाहेर गेले तर पेशंटजवळ बसायचं अशी छोटी-छोटी त्यांची कामंही करू लागले. ते पैसे देऊ लागले तरी मी कधी घेतले नाहीत. घेतही नाही. कारण त्यांना मदत करून मलाच खूप आनंद मिळतो. ते माझ्या येण्याची वाट पाहतात, यानंच भरून पावल्यासारखं होतं. जगण्याचा उद्देश मला सापडला. आता मी रोज आनंदात असते; शांत झोपू शकते. तिथले डॉक्टरही आता मला येत रहा असं सांगतात. या डॉक्टरांची तिथंच ओळख झाली.'

शोभनाने आशाचं बोलणं लक्षपूर्वक ऐकलं. तिच्या कहाणीवरून शोभनाला समजलं ते फार मोलाचं होतं. ते आपणही समजून घेतलं पाहिजे. धन-दौलत असेल तर सर्व सुखं विकत घेतात. पण ती इंद्रिय-सुखं असतात. लोकांनी कौतुक केलं की कान सुखावतात. उंची कपडे घातले की आरशात पाहून डोळे सुखावतात. पंचपक्वान्नं खाऊन जीभ सुखावते. अशी सुखं इंद्रियांना सुख देतात पण मनाला आनंद देऊ शकत नाहीत. मात्र, लोकांची निरपेक्ष सेवा करून मनाला आनंद मिळतो. पैसे घेऊन केलं जातं ते काम असतं, सेवा नसते. काही अपेक्षा अथवा स्वार्थ न ठेवता जी मदत केली जाते, इतरांच्या उपयोगी पडलं जातं त्याला 'सेवा' म्हणता येईल. 'आत्ता मी ह्यांचं काम केलं, तर उद्या तेही मला पास करतील, किंवा मला बढती मिळेल' असे उद्देश मनात ठेवून काही केलं तर तो स्वार्थ होईल. त्यात कसला आनंद? लक्षात घेतलं पाहिजे, सुख आणि आनंद यात फार फार फरक आहे. यातलं आपल्याला काय हवं, ते आपणच ठरवायचं.

आशाकडून शोभनाला खूप शिकायला मिळालं. ती शहरातल्या अनाथाश्रमात जाऊ लागली. तिथे देणगी तर दिलीच; पण त्या मुलांसोबत वेळ घालवू लागली. ती शाळेत जाणारी मुलं होती. वयानं लहान-मोठी. त्यांना गोष्टी सांगणं, त्यांचा अभ्यास घेणं, त्यांच्या अडचणी सोडवणं यात तिला अपरंपार आनंद मिळू लागला. ती मुलं तिची वाट पाहू लागली; तिलाही त्यांची ओढ वाटू लागली. सेवा हाच आनंदाने जगण्याचा मार्ग आहे, हे तिला कळलं. उदासी पळून गेली.

दोस्तांनो, श्रीमंत असणं, तसं होण्याची इच्छा बाळगणं यात काही चूक नाही बरं का. फक्त पैसे चांगल्या मार्गानं मिळवले पाहिजेत, हे तत्त्व पाळायचं; बस्! !

# <u>ऑल्वेज बी एलर्ट</u>

राजू सकाळी उठला आणि आईच्या कॉटजवळ गेला. 'आई, कशी आहेस आज तू? बरं वाटतंय ना? ' आई हलक्या आवाजात म्हणाली, ' हो, आज जरा बरं आहे. तू शाळेत जा.आज सोमवार; शाळेत परीक्षा आहे ना तुझी? तुला गेलंच पाहिजे. माझी चिंता करू नकोस.' ' मी जाईन; पण तू औषधं घेशील ना वेळेवर? बाई येतीलच.'

'हो, हो.घेईन मी औषधं. तू आवर.'

'आई, आज मी तुझा मोबाईल बरोबर नेऊ? म्हणजे काही वाटलं तर तू मला फोन करू शकशील. आणि हा हँडसेट तुझ्या बेडवरच ठेवून जातो. म्हणजे तुला उठायला नको.'

मोबाईलसह दप्तर घेऊन राजू शाळेत गेला.

त्याच्या वडिलांची बदली झाल्यामुळे तो या शाळेत नव्यानेच दाखल झाला होता. शाळेत पोहोचल्यावर त्याने मोबाईल टीचरकडे दिला. तो आणण्याचे कारणही त्यांना सांगितले. त्या म्हणाल्या, 'मी बोलावीन तुला काही फोन आला तर.'

पेपर संपवून राजू परत टीचरकडे आला.त्या म्हणाल्या, 'तुझ्या घरी दुसरं कोणी नाही?'

'नाही; माझे पप्पा मिलिटरीत आहेत. सध्या त्यांचं पोस्टिंग बॉर्डरवर सियाचीनला झालं आहे.तिथे फोन पण जात नाही. अन् आई म्हणते अशा लहानसहान आजारपणाबद्दल त्यांना कळवून त्यांना कशाला काळजी लावायची? त्यांचं काम जास्त महत्त्वाचं! '

टीचर हसल्या. मोबाईल घेऊन राजू निघाला. पायी पायी.

वाटेत त्याला कचरा-पेटी लागली. ती गच्च भरून वाहात होती.आजूबाजूलाही कचरा सांडला होता. राजूचं लक्ष गेलं, तिथे एक पार्सलसारखी वस्तू पडली होती. ते उघडं नव्हतं. राजूला

वाटलं काय असेल त्यात? मग त्याला शंका आली, यात बॉम्ब तर नसेल? जर असला तर? मला हे पोलिसांना कळवायला हवं! पण बॉम्ब नसेलच तर? मी त्यांना खोटं कळवलं असा माझ्यावरच आरोप होईल. पण असला तर मी कळवल्यामुळे पुढचा अनर्थ टळू शकेल. त्याने विचार पक्का केला व त्या पार्सलचा फोटो व माहिती पोलिसांना शंभर नंबर वर कळविली. तो घरी पोहोचला व आईला त्याविषयी सांगितलं. 'आई, मी बरोबर केलं, ना? ' आई म्हणाली, 'हो बेटा, अगदी योग्य केलंस'

थोड्याच वेळात दारावरची बेल वाजली. राजूने दार उघडलं. पाहिलं तर बाहेर तीन-चार पोलीस होते. राजू थोडा घाबरला. आई त्याच्या मागे येऊन उभीच होती.

'तूच राजू का? तूच फोन केला होतास ना? फोटोही पाठवला होतास? '

'हो मीच राजू. पण काय झालं? '

त्यांच्यातला अधिकारी म्हणाला, 'घाबरू नकोस; तू चांगलंच काम केलं आहेस. तो बॉम्बच होता. काही वेळात फुटणारच होता. तू अगदी वेळेवर फोन केलास.त्यामुळे पुढची हानी टळली; आणि लोकांचे प्राण वाचले. तुला दक्षतेचं ऍवॉर्ड नक्की मिळेल. आम्ही तुझं नाव पुढे पाठवणार आहोत.'

अधिकाऱ्याने राजूला वडिलांबद्दल विचारलं, तेव्हा त्यांना कळलं की ते मिलिटरीमधेच आहेत व देशरक्षणाचं काम करत आहेत.ते म्हणाले,

'हंऽऽ! मग बरोबर; शूर सैनिकाचा शूर मुलगा आहेस तू! कौतुक आहे तुझं. तुझ्या आईवडिलांनी तुला चांगला नागरिक घडवला आहे.' असं म्हणून पोलीस निघून गेले.

मित्रांनो, कशी वाटली गोष्ट? ह्या गोष्टीच्या मूळ लेखिका आहेत श्रीमती पवित्रा अग्रवाल. तुमच्यासाठी मी ती त्यांच्या परवानगीने थोडी लहान केली. तुम्हाला या गोष्टीवरून नक्की काही शिकता येईल. तुम्हीसुद्धा राजूप्रमाणे दक्ष (ऍलर्ट) रहायला शिका. चांगल्या नागरिकाचं ते कर्तव्यच आहे. रस्त्यावर काय घडतंय, काय सावधानता बाळगली पाहिजे, हे

त्यावेळी सुचलं पाहिजे. एखादा अपघात जरी पाहण्यात आला तरी ‘आपण यात काय मदत करू शकतो, ते पाहिलं पाहिजे. तुमची मदत छोटीशी असेल, पण त्यावेळी ती मोलाची असते.

दुसरं, मोबाईलचा वापर हा केवळ गेम खेळण्यासाठी नाही. त्याचा योग्य तोच उपयोग करायला हवा. आणखी एक; राजूनं जरूर होता म्हणून मोबाईल शाळेत नेला; पण तो दप्तरात लपवून ठेवला नाही. प्रामाणिकपणे टीचरांजवळ दिला. कारण शाळेत मोबाईल आणायला परवानगीच नव्हती. तुम्हीही प्रमाणिकपणा शिका. हल्ली जग खोट्याचं आहे असं म्हटलं जातं. ते का? आपण खोटेपणा करतो म्हणून! आपण खरेपणानं वागलो तर तेच जग खऱ्यांचं होऊन जाईल, हो की नाही?

आपल्या स्वामींचं नाव ‘सत्यसाईबाबा’ आहे; आपण सत्याचीच कास धरायला हवी व इतरांनाही तसं वागायला भाग पाडायला हवं.

राजूचे वडील व इतर सैनिक सियाचीन बॉर्डरवर काम करतात. तिथे इतक्या उंचीवर, इतक्या थंडीत (मायनस40 डिग्री सें), प्रतिकूल परिस्थितीत ते प्राण पणाला लावून सीमेचं रक्षण करतात. म्हणूनच आपण घरात शांतपणे झोपू शकतो. आपण त्यांच्याबद्दल नेहमी कृतज्ञ असायला हवं. देशाची उत्तम सेवा करायची असेल तर तुम्हीही ‘फोर्सेस’ जॉइन करू शकता. केवळ सैनिकच नव्हे, तर तिथे इंजिनियर्स, डॉक्टर्स, नर्सेस, इतकंच काय स्वयंपाक बनविण्यासाठी केटरर्सचीही आवश्यकता असते! याच वयात ठरवून टाका तुम्हाला काय व्हायचंय ते!

# वर्ण आणि जात—सब झूट!

कृष्णाचे गुरु कोण होते माहीत आहे ना तुम्हाला? त्यांचं नाव सांदीपनी. त्यावेळी गुरूंच्या आश्रमात राहूनच विद्याभ्यास करावा लागे. तसा कृष्णही सांदीपनी आश्रमात राहात होता. कृष्णाबरोबरच त्याचे मित्र सुदामा, पेंद्या व हाळी नावाचाही एक मित्र, असे सर्वजण आश्रमात राहून शिकत होते. गुरूकडे राहून विद्यार्जन करतांना पडतील ती कामेही करावी लागत असत. एकदा गुरुपत्नीला इंधनासाठी व होमासाठी चंदनाच्या लाकडांची गरज होती. तिने या विद्यार्थ्यांना जंगलात ते काम करण्यास पाठविले.

ही मुले जंगलात गेली पण झाडे कोणती आहेत, कोणती व कुठे कापायची याचे ज्ञान फक्त हाळी याला होते. हाळी तर अगदी गरीब, बिनशिकलेला असा होता.पण हे ज्ञान त्याला चांगले होते. कृष्ण म्हणाला, ‘हाळी तू तुझी बुद्धी वापरून झाडं ओळखून आम्हाला मार्गदर्शन करतो आहेस; म्हणजे तू आत्ता ब्राह्मण आहेस.’ हाळी व इतरही मित्र चकित होऊन ऐकत होते. कृष्ण पुढे म्हणाला,

‘ मी कुऱ्हाडी देणे, लाकडं गोळा करणे ही कामं करतो आहे ना, मग मी झालो शूद्र. आणि हातात काठी घेऊन पेंद्या उभा आहे तो आपलं रक्षण करतो आहे; साप, किंवा तसले प्राणी आपल्या बाजूला येऊ नयेत म्हणून तो सजग उभा आहे, तर तो झाला क्षत्रिय.’ कृष्णाचं बोलणं कोणाला नीट कळत नव्हतं.

काम संपल्यावर सगळे परत निघाले. वाट जरा घोटाळ्याची होती. सगळे गोंधळले. पण कृष्णाने डोकं वापरून कुठल्या वाटेनं जायचं हे निश्चित केलं. तेव्हा तो म्हणाला आता मी झालो ब्राह्मण. हाळीने डोक्यावर लाकडाची मोळी घेण्याचं काम स्वीकारलं तेव्हा तो झाला शूद्र.’

वाटेत एक गाडीवान भेटला. ‘जास्तीच्या दोन मोळया गाडीतून नेशील का? त्या बदल्यात तुला आम्ही चंदनाचा भुस्सा देऊ.’ अशा वाटाघाटी सुदाम्यानं केल्या. तेव्हा कृष्ण म्हणाला आता सुदामा झाला वैश्य. वाट चालतांना पेंद्या मुद्दाम मोठमोठे आवाज काढत होता जेणेकरून प्राणी वगैरे दूर पळून जावेत. ‘तर तो झाला क्षत्रिय.’

कृष्णाला मित्र म्हणाले, ‘आम्हाला काही कळत नाहीए. तूच समजावून सांग ना.’

कृष्ण सांगू लागला, ‘जेव्हा डोकं वापरून बुद्धीने कोणी काम करत असेल तर तो होतो ब्राह्मण. त्या कामाला अनुकूल परिस्थिती निर्माण करून देणारा, अडथळा येऊ नये म्हणून दक्ष असणारा तो क्षत्रिय. त्या कामासाठी पायपीट करून कामाचं योग्य मोल मिळेल असं बघणारा तो वैश्य; आणि कामात डोकं न वापरता पण मदत करणारा तो शूद्र.’

आपण ज्यावेळी जे काम करत असू त्यावरून आपला ‘वर्ण’ ठरतो; जन्मावरून नाही. उदाहरण पाहा, एखादी स्त्री सकाळी चहा नाश्ता बनवते, स्वयंपाक करते, वाढते यावेळी ती सर्वांची सेवा करत असते.मुले शाळेत व पती कामाला जाणार, यात ती मदत करत असते तेव्हा ती शूद्र असते. आवरून, ती स्वतः शिक्षिका असेल तर ती शाळेत जाऊन शिकवते, तेव्हा ती ब्राह्मण असते. रविवारी ती भंगारवाल्याला बोलावून घरातली रद्दी, इतर नको ते सामान देते, पैसे घेते तेव्हा तीच वैश्य असते. बाजार करते तेव्हा वैश्य व पिशव्या हातात घेऊन घरी येते, तेव्हा ती पुन्हा शूद्र असते. मांजर घरात शिरलेले दिसले तर ती त्याला हाकलते, रात्री सगळी दारे नीट बंद आहेत का हे पाहून मग ती विश्रांतीला जाते, तेव्हा ती क्षत्रिय असते. आहे ना गंमत? वर्ण हा कामावरून ठरत असतो. जन्मावरून नव्हे. एकच व्यक्ती क्षणात आपला वर्ण बदलू शकते. क्षणात ब्राह्मण तर क्षणात शूद्र.

आपण वर्ण, जात यांचा फारच घोटाळा करून ठेवला आहे. इतका की माणूस आत त्या जाळयात जास्त जास्तच गुरफटत चालला आहे.राजकारण त्यावरच चालतं आणि एकूणएक क्षेत्रात जातीचं राजकारण घुसलं आहे.मित्रांनो, कृष्णानं किती सोप्या पद्धतीनं ‘वर्ण व जात’

निरर्थक आहेत हे सांगितलं आहे, पाहिलं ना? गीतेतही कृष्णानं असंच स्पष्ट केलं आहे. पण गीतेत 'चातुर्वर्ण्य' सांगितला आहे, जाळून टाका गीता. असंही मधल्या काळात म्हटलं गेलं.

मित्रांनो, तुमच्या नव्या पिढीला आता हे बदलायचे आहे. स्वामी सुद्धा विद्यार्थ्यांशी अधिक जवळीकीने वागायचे; कारण तुम्हीच उद्याची आशा आहात. तेव्हा हे समजूनच वागाल ना?

तुम्हाला वाटेल इंधनासाठी झाडे का तोडली? पण, त्याकाळी जंगलं खूप व माणसे फार थोडी होती. लोकसंख्या वाढली म्हणूनच समस्या निर्माण झाल्या. दुसरे शोध लावण्याची गरज पडली. म्हणतात ना, गरज ही शोधाची जननी असते. म्हणून तेव्हा लाकूड हे इंधन वापरलं जायचं. आता मात्र ते चूक आहे. आता साईकृष्ण आपल्याला इंधन व पाणी वाचवायला सांगत होतेच नं! साईराम!

## तुम्ही फक्त सुरुवात तर करा! ...

सूफी संत राबिया हिच्याकडे एकदा दोन संत आले. ते खूप भुकेलेले होते. त्यामुळे त्यांनी आल्या आल्या राबिया कडे खायला मागितले. राबियाकडे फक्त दोन भाकरी होत्या. त्या दोन्ही भाकरी तिने संतांपुढे ठेवल्या. ते खायला सुरुवात करणार इतक्यात दारात एक फकीर आला. तोही म्हणाला, 'माई, मला खूप भूक लागली आहे. खायला देशील? '

राबिया पुढे प्रश्न पडला. ती क्षणभर विचारात पडली. पण पुढच्या क्षणी तिनं काहीतरी ठरवलं व संतांच्या पुढे ठेवलेल्या दोन भाकरी उचलून तिने त्या फकीराला दिल्या! दोघे संत अचंबित झाले. पण ते काही बोलले नाहीत. फकीर दोन भाकरी घेऊन निघून गेला.

थोड्याच वेळात राबियाच्या एका श्रीमंत मैत्रिणीची नोकराणी एक झाकलेली थाळी घेऊन आली. राबियाने पाहिले त्यात भाकरी होत्या. तिने भाकरी मोजल्या; तर त्या अठरा भरल्या. राबियानं थाळी झाकून परत नोकराणीकडे दिली. म्हणाली 'मला या नकोत'. बाकी काही सांगितले नाही.

थोड्या वेळाने नोकराणी पुन्हा थाळी घेऊन आली. त्यात भाकरी होत्या. तिने त्या मोजल्या. आता त्यात वीस भाकरी होत्या. मग मात्र राबियाने त्या घेतल्या. आणि थाळीत घालून त्या संतांपुढे ठेवल्या. संत जेवू लागले; कारण भूक सतावत होती. पण त्यांना राबियाच्या वागण्याचे गूढ समजत नव्हते. एका संताने जेवता जेवताच राबियाला विचारले, 'तुम्ही पहिल्यांदा भाकरी परत पाठवल्या, नंतर घेतल्या; हे कसे काय? '

राबिया म्हणाली, 'तुम्ही खूप भुकेलेले होता, हे माझ्या लक्षात आलं होतं. तुम्हाला दोन भाकरी पुरणार नाहीत हे मला माहीत होतं. काय करावं या विचारात मी होते. तेवढ्यात तो फकीर आला. त्याला पाहताच मला कुराणातलं खुदानं दिलेलं एक वचन आठवलं. त्यात त्यानं म्हटलं होतं, 'तुम्ही मला एक द्या; मी तुम्हाला दहा देईन.'

राबिया पुढे म्हणाली, मग मी तुमच्यापुढच्या दोन भाकरी उचलून फकीराला दिल्या. नोकराणीनं पहिल्यावेळी थाळी आणली तेव्हा त्यात अठराच भाकरी होत्या. मी दोन भाकरी फकीराला दिल्यामुळे मला वीस भाकरी हव्या होत्या. तो हिशोब जमत नव्हता म्हणून मी त्या परत पाठविल्या. दुसऱ्या वेळी हिशोब बरोबर झाला. खुदा आपलं वचन कधीच मोडणार नाही, मला माहित होतं.. आता तुम्ही पोटभर जेवा..मला आनंद झाला आहे.'

ते संत जेवून तृप्त झाले आणि राबियालाही समाधान मिळालं.

मित्रांनो, आपले स्वामी सत्यसाईबाबाही सांगत आले आहेत, 'तुम्ही माझ्याकडे एक पाऊल टाका; मी दहा पावलं तुमच्याकडे येईन.'

खुदा काय किंवा आपले बाबा काय, दोघांमधे काहीच फरक नाही. तेव्हा आपण त्यांच्या कार्यात एक पाऊल टाकलं की, न मागताही त्यांची दसपट कृपा आपल्यावर होईल, हे ध्यानात ठेवा, व कामाला लागा.

तुमच्या लक्षात आले ना? धर्म कुठलेही वेगवेगळे असोत, परमेश्वर एकच आहे. त्यांची वचनंही एकच आहेत! नावं फक्त वेगवेगळी आहेत; खुदा, बुद्ध, महावीर, झोराष्ट्र, येशू किंवा सत्यसाई! सर्वजण एकच. तो परमेश्वर. ते दिव्यत्व! !

# ऋषी कोणाला म्हणावे?

मित्रांनो, ‘ऋषि’ हा शब्द आपल्याला माहीत असतो; पण त्यांच्याबद्दल केवळ पुसटशी कल्पना असते. आपण त्यांच्यासंबंधी थोडी माहिती करून घेऊ.

असे म्हणतात की वेद कोणी एका पुरुषाने लिहिलेले नाहीत; म्हणूनच वेदांना ‘अपौरुषेय’ असे संबोधतात. दिव्य प्रेरणेने ऋषींना वेदमंत्र स्फुरलेले आहेत. वेदांचे ज्ञान असणे हेच ऋषित्वाचे लक्षण आहे असे तैतरीय आरण्यकात लिहिले आहे. तपश्चर्या व ज्ञानप्रसारण हीच ऋषीची दोन कर्तव्ये आहेत. तपश्चर्या म्हणजे वाणी शरीर आणि मन यातील दोषांचे निराकरण करणे. त्यांना नष्ट करणे. ज्ञानाचे प्रसारण म्हणजे वैदिक मंत्राचे पठण, शिक्षण व जीवनात त्यानुसार आचरण. ऋषि ज्ञान आधी आत्मसात करतात व मग त्याचा प्रसार करतात.

ऋषींचे तीन प्रकार मानले आहेत. महर्षी, ऋषी आणि ऋषिपुत्र. ब्रह्मदेवाचे दहा पुत्र मानले गेले आहेत, त्यांना महर्षी म्हणतात, त्यांची नावे अशी—भृगु, मरिच, अत्रि, अंगिरा, पुलह, ऋतु. मनु, दक्ष, वसिष्ठ आणि पुलस्त्य. आपला असा गैरसमज असतो की ऋषी जंगलातच राहात होते किंवा राहतात. ऋषी कुटुंबप्रिय असत; त्यांना मुलेही असत. ते युद्धात व राजकारणातही भाग घेत असत. ते यज्ञ करीत असत व मुख्य म्हणजे ईश्वराची आराधना चालूच असे. द्रोणाचार्य यांचा अश्वत्थामा हा पुत्र होता.

मित्रावरुण व उर्वशी यांचे पुत्र म्हणजे वसिष्ठ ऋषी. ते इक्ष्वाकु राजांच्या कुळाचे पुरोहित होते. याच कुळात पुढे रामाचा जन्म झाला. वसिष्ठ हे रामाचे गुरु होते. यांनीच वेदातील सातव्या मंडलातील 104 सूक्तांची (वेदातील श्लोकांची) रचना केली आहे. म्हणजे ईश्वरी प्रेरणेने त्यांना सूक्ते स्फुरली आहेत. त्यांनी धर्मसूत्रेही लिहिली आहेत.

वेदांनंतर उपनिषदे आली. त्याकाळच्या ऋषींनी कुटुंबापासून दूर राहणे पसंत केले. ते जंगलात राहू लागले. कौटुंबिक व सांसारिक सुखापासून ते दूर राहिले. त्यावेळी, जंगलात राहून तपस्या करणारे, विरक्त, ज्ञानी, द्रष्टा, दैवी पुरुष अशी ऋषींची प्रतिमा बनली. याज्ञवल्क्य, सनतकुमार, शांडिल्य, दधीची इ. उपनिषत्कालीन ऋषी होते. त्यानंतरच्या पुराणकाळात ऋषी

ज्ञानी, तपस्या करणारे असे होते. ते जंगलात पण कुटुंबासह राहत असत. जमदग्नी, दुर्वास, विश्वामित्र हे पुराणकालीन ऋषी होते. जनमेजय व परीक्षित राजांच्या काळात वैशंपायन ऋषी होते. त्यानंतर ऋषी-परंपरा बंद झाली असे म्हणतात. पण काळानुसार ऋषी या व्यक्तीत बाह्य बदल होत गेले. ऋषी उरले नाहीत असे म्हणता येणार नाही.

आपण ऐकलेले असते की आजही हिमालयासारख्या एकांतस्थळी राहून काही साधू तपःसाधना व ज्ञानसाधना करतात. तेही आधुनिक काळातील ऋषीच होत. काही वर्षांपूर्वी स्वामींनी त्यांच्या विद्यार्थ्यांपैकी आध्यात्मिक प्रगतीनुसार पात्र अशा 15-16 जणांना निवडून त्यांना फार मोठी जबाबदारी दिली आहे. ते सर्व वेदांचे सखोल अध्ययन, जतन व चिंतनात मग्न आहेत. त्यानुसार समाजाचे आचरण कसे सुधारावे याची काळजीही ते वाहतात. मात्र त्यांच्याबाबत गुप्तता बाळगली जाते. ते कधी पुट्टपर्तीला आले तरी त्यांना कोणी ओळखू शकणार नाही, इतके ते सर्वांसारखेच राहतात, दिसतात. त्यांच्यापैकीच एकाने स्वामींच्या परवानगीनंतर एक प्रदीर्घ मुलाखत दिली; त्याचे पुस्तक बऱ्याच वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाले आहे. त्याचे नाव 'नर-नरायण-गुंफा'. जिज्ञासूंना ते वाचता येईल. ते प्रशांतिमध्ये मिळते. असे हे आधुनिक ऋषी होत. ऋषी हे त्यांच्या गुणांवरून, विद्वत्तेवरून व आचरणावरून ठरतात. आजही काही जणांचा उल्लेख 'ऋषीतुल्य व्यक्तिमत्व' असा केलेला आपण वाचतो.

चांगली समाजरचना होण्यास मदत करणे, समाज सुसंस्कारित करणे, मानवी-जीवन ज्ञान व संस्कारांनी परिपूर्ण व्हावे यासाठी मार्गदर्शन करणे इ. विधायक कामे ऋषी करत आले आहेत व आजही करत आहेत. उदा. द्रोणाचार्य ऋषी हे कौरव-पांडवांचे, धृतराष्ट्र राजाच्या पदरी होते; त्यांचे मार्गदर्शक होते. आजही सरकारला सल्ला देणारी मंडळे असतात. त्यातील व्यक्ती प्रशिक्षित, स्वतः उच्च दर्जाची बुद्धिमत्ता असणारे व अनेक विषयात पारंगत असतात. त्यांचाही दर्जा साधारण तोच म्हणता येईल.

आपण समाजात राहतो; आपण आपले आचरण समाज निरोगी रहावा असे ठेवले पाहिजे. म्हणूनच वेदांची महती आपण पटवून घेण्यासाठी स्वामींनी आपल्याला वेदपठण, वेदांचा अर्थ समजावून घेऊन त्यानुसार आचरण करण्याचा आदेश दिला आहे. बाल-विकास वर्गात वेदपठण शिकविले जाते ते यामुळेच. यातून बरेच काही शिकता येईल.

# त्याला मित्र करू या

जुलै मध्ये अवघा महाराष्ट्र जलमय झाला. जिकडे तिकडे भरपूर पाऊस पडला. पाणीटंचाईने ग्रासलेल्या गावांना,शेतांना, गुराढोरांना पाणी देऊन निसर्गानं माणसासह सर्वांची तहान भागवली. निसर्ग दयाळू झाला.त्यानं कृपा केली.

निसर्गाच्या या उदारतेबद्दल बोलत असतांनाच काही घटना घडल्या; आणि सर्वजण निसर्गाला दोष देऊ लागले. अतिवृष्टीमुळे नद्यांना पूर आले व घरे वाहून गेली; माणसे-गुरे वाहून गेली. गावांशी संपर्क तुटला. ठळक घटना म्हणजे सावित्री नदीवरील पूल तुटून वाहून गेल्यामुळे प्रवासी बसेस व कार नदीत पडून माणसे कोंडली गेल्यामुळे मृत्युमुखी पडली. त्यांची कुटुंबे उद्ध्वस्त झाली. मुलं अनाथ झाली. कर्ते पुरुष गेल्यामुळे कुटुंबांवर पुढे काय असा प्रश्न उभा राहिला. निसर्गाचा कोप म्हणून पूर आला; देवाला 'नैवेद्य' (बळी) द्यायला हवा; असे अवैज्ञानिक पडसादही ऐकू आले.

मित्रांनो, निसर्ग दयाळू आहे का निसर्ग क्रूर आहे असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. पण खोलवर विचार केल्यास पटतं की निसर्ग हा नेहमी त्याच्या मूळ उपकारक स्वभावानुसारच वागतो. पण माणूस निसर्गाला सतत ओरबाडत असतो. शिवाय तो जे काम करतो तिथे तिथे भ्रष्ट आचरण करतो. कसं?

पुलांची पाहणी करून 'ठीक आहे' असा अहवाल देणारे प्रत्यक्षात काम न करताही पाहिजे तसा अहवाल देतात. त्यासाठी त्यांना गैरव्यवहाराबद्दल पैसे ही मिळतात. त्या कामात गुंतलेले सगळे यात 'एकी' दाखवतात, साथ देतात. घरांची बांधकामे करतांना योग्य माल न वापरता सिमेंटचे मिश्रण प्रमाणित न करता तसेच निकृष्ट दर्जाचे काम केल्यामुळे स्लॅब कोसळणे; नवी बांधकामे पडणे व त्याखाली गरीब कामगार, मजूर यांचे जीव जाणे अशा घटना आपण वाचतो. याला कोण जबाबदार असतं? माणूसच! कारण त्याने प्रमाणिकपणा हे मूल्य पाळलेलं नसतं.

डिस्कव्हरी सारख्या वाहिनीवर चांगल्या चित्रफिती दाखवल्या जातात. उड्डाणापूर्वी विमानाची कसून तपासणी करण्याचा नियम असतो. शेवटी ते कामही एखादा नेमलेला माणूसच करतो न? एकदा एकाने पैशाकरता नव्हे, पण आपलं काम ढिसाळपणे केलं कामात कसूर केली. केवळ एक मोठा खिळा नीट पिळून घट्ट न केल्याने अपघात झाला व सुमारे तीनशे माणसे प्राणाला मुकली! हे एका खिळयामुळे झालं ही गोष्ट अपघाताच्या नंतर तपासाअंती कळली. ज्याच्यावर ती जबाबदारी होती त्याला दीर्घ तुरुंगवासाची शिक्षाही झाली. त्याने आपलं काम प्रामाणिकपणे केलं असतं तर त्या माणसांचे जीव वाचले असते; असं तुम्हालाही वाटेल ना?

निसर्गसुद्धा पंचमहाभूतांचे संतुलन राखण्याकरता किंवा काही अंतर्गत घडामोडीं मुळे उग्र रूप धारण करत असतो. उदा. पृथ्वीच्या पोटातील भागात तापमान वाढल्यामुळे उद्रेक होतो;व ज्वालामुखी भडकतो. पृथ्वीच्या स्तरांमध्ये हालचाल होऊन भूकंप होतो. समुद्रात तळाशी भूकंप झाला तर त्सुनामी सारखे संकट येते. अशा घटनांवर माणसाचं नियंत्रण नाही. अशा आपत्तींच्या प्रसंगी आपण एकच करू शकतो; मदतकार्य, सेवाकार्य. त्यावेळी जात, धर्म, पंथ अशा क्षुल्लक गोष्टी विसरून हे कार्य केलं पाहिजे. समाजात अजून असंही घडतांना दिसतं ही समाधानाची बाब आहे. पण ते आणखी मोठ्या प्रमाणावर घडलं पाहिजे.

घरं बांधण्यासाठी समुद्र आत ढकलणं; बांध घालून नदीचं पात्र कमी करणं; राहण्याची सोय होण्यासाठी तुफान वृक्षतोड करणं या व अशासारख्या अनेक आक्षेपार्ह गोष्टी करून माणूस निसर्गावर ताबा मिळवू पाहतो. ही भौतिक सोयींची लालसा माणसानं सोडायला हवी. निसर्गाशी मित्रत्वानंच वागलं पाहिजे. आपण त्याला आव्हान दिलं तर परिणाम आपल्यालाच भोगावे लागतात. पृथ्वीचं वाढणारं तापमान, पृथ्वीभोवतीच्या संरक्षक ओझोन थराला छिद्रे पडणं, धरणामधून पाणी-गळती होऊन धरण फुटण्याची भीती निर्माण होणं ही सर्व मानव-निर्मित संकटं उद्या आपल्यावर कोसळतील व परिणाम भोगावे लागतील. प्रचंड वाढणारी लोकसंख्या हे देखील आपल्या देशापुढचं संकटच आहे. आहे त्या लोकसंख्येसाठी पुरेल असं काम करायला जावं तर ते पूर्ण होईपर्यंत लोकसंख्येत भर पडलेली असते. पुन्हा तुटवडा कायमच राहतो! ! अशी संकटांची मालिका तयार व्हायला माणूस अधिक जबाबदार आहे.

माणसानं प्रामाणिकपणा हे मूल्य सगळीकडे जपलं तर भ्रष्टाचारामुळे होणारे अपघात नक्कीच टळतील. निसर्गाने आपल्याला जगू द्यावं असं वाटत असेल तर आपण निसर्गाचं

रक्षण केलं पाहिजे हे लक्षात ठेवावं. नव्या पिढीपुढे हे मोठं आव्हान आहे. म्हणून तुम्हाला जागं करण्यासाठी हा लेखप्रपंच! मोठं झाल्यावर कामं कराल तेव्हा मूल्ये जपून काम करा.

# पगार

मित्रांनो, नुकतीच एक जागतिक स्पर्धा झाली. दरवर्षी होणाऱ्या या स्पर्धेत फक्त मुलींना भाग घेता येतो. त्यांच्या विविध चाचण्या घेण्यात येतात. त्यांचे सौंदर्य हा तर एक मुख्य मुद्दा असतोच; पण त्याचबरोबर त्यांचे शिक्षण, ज्ञान, सामान्य ज्ञान (जनरल नॉलेज), व मुख्य म्हणजे त्यांचा सामाजिक दृष्टिकोन व त्यांचे विचार यावरही प्रश्न विचारले जातात. यात जी मुलगी सर्व बाबतीत उत्तीर्ण होते, तिला 'जागतिक सुंदरी' म्हणून घोषित केले जाते. बऱ्याच चाळण्यांमधून जातांना बऱ्याच मुली वगळल्या जातात (एलिमिनेशन पद्धत) व शेवटी राहणाऱ्या 10/15 जणींपैकी क्र. एक, दोन व तीन निवडले जातात.

या स्पर्धेत सबंध जगातील तरुणी भाग घेतात. त्यातून आपल्या भारतातील हरियाणाची मानुषी छिल्लर नावाची 17 वर्षीय तरुणी पहिल्या क्रमांकासाठी निवडली गेली! ही आपल्याला अभिमानाचीच बाब आहे. मानुषी आधीच्या सर्व चाचण्यात पास झाली. पण एका प्रश्नाला दिलेल्या उत्तरामुळे तिने इतरांना मागे टाकले व या स्पर्धेचा प्रथम क्रमांकाचा मुकुट तिच्या डोक्यावर ठेवण्यात आला.

मित्रांनो, प्रश्न असा होता, 'कोणत्या क्षेत्रातील व्यक्तीला सर्वात जास्त पगार मिळायला हवा, असं तुम्हाला वाटतं? व का? '

या प्रश्नाला तिनं दिलेलं उत्तर सर्वांना चकित करणारं पण आनंद देणारं होतं! तिनं उत्तर दिलं, 'सर्वात जास्त पगार आईला मिळायला हवा. कारण ती आपल्या अपत्यासाठी जे काही करते त्याचं मोजमापच नाही. एकूणच ती आपल्या कुटुंबाला आधार मानसिक व भावनिक देत असते. आजच्या काळात तर ती आर्थिक आधारही देत असते. स्वतःचा विचार न करता ती कुटुंबासाठी जे जे लागेल ते सर्व करायला तयार असते. त्यात ती अनेक प्रकारे त्याग करत असते.'

आपल्या मुलांना वाढवतांना ती मुलांसाठी जे काही करते ते करण्यासाठी नोकर ठेवले तर असे मानले तर त्यांना किती पगार द्यावा लागेल असे संशोधन फोर्ब्ज या एका अमेरिकन

कंपनीने केले. त्यात निघालेला निष्कर्ष असा की आईला वार्षिक एक लाखपंधराहजार अमेरिकन डॉलर पगार द्यावा लागेल! ! डॉलरचा भाव 60 रुपये धरला तर ती रक्कम 69 लाख भारतीय रुपये होते. याचा अर्थ आईला दरमहा पाचलाख पंच्याहत्तरहजार रुपये इतका पगार द्यावा लागेल! 'सॅलरी डॉट कॉम' या वेबसाईटवर ही माहिती उपलब्ध आहे.

मुलांचे शारीरिक भावनिक व आत्मिक पोषण करणे, त्यांना योग्य व चांगला माणूस बनविणे हे जे काम आई करते, ते कोणत्याही नोकराकडून होणे शक्यच नाही. ती जे प्रेम देते ते इतर कुठूनही मिळणे अशक्य असते. आईच आपला पहिला गुरु असते. या कशाचेही मोजमाप करणे ही अशक्यप्राय गोष्ट आहे.

हे सर्व वर्णन थोडक्यात मानुषीने सांगितले व पहिला क्रमांक पटकविला.

मित्रांनो, आई हे परम दैवत असते असे स्वामी देखील सांगतात. कधीही आईला दुखवू नका. जी मुले मोठी झाल्यावर हे आईची महती विसरतात, त्यांना परमेश्वर कधीच माफ करत नाही. तुम्ही मोठे झाल्यावर हे लक्षात ठेवा, ही तुम्हाला कळकळीची विनंती! मातृभक्ती व पितृभक्ती करा.

# दान

मित्रांनो, आज मी तुम्हाला जुन्या काळातील एक गोष्ट सांगणार आहे. एका गावात एक गरीब कुटुंब राहत होतं. जेमतेम हाता-तोंडाची गाठ पडत होती. त्याचं नाव मात्र राजा होतं. एकदा बायकोनं नवऱ्याला-राजाला- सांगितलं, 'शेजारच्या गावात म्हणे, एक श्रीमंत शेट राहतात; ते पुण्य विकत घेतात. त्यांच्याकडे जाऊन बघा, त्यांनी काही पैसे दिले तर....'

राजा चालत निघाला. बायकोनं त्याच्याबरोबर चार भाकरी करून दिल्या. चालता चालता दमल्यावर, एका ठिकाणी तलाव दिसला. त्याच्या काठी बसून भाकरी खावी असा विचार करून तो झाडाखाली बसला. तो खाणार तेवढ्यात त्याच्यासमोर एक कुत्री येऊन उभी राहिली. तिला नुकतीच पिल्लं झाली होती. खूप पावसामुळे तीनचार दिवस तिला काही खायला मिळालं नव्हतं. राजानं तिला एक भाकरी खायला दिली. तिनं ती संपविली. पण ती जाईना. राजानं आणखी एक भाकरी दिली. असं करता करता, तिनं चारही भाकरी खाल्ल्या. राजा तसाच उठून चालू लागला.

शेटच्या घरी पोहोचला. त्यांनी विचारलं, 'काय काम आहे? ' राजानं सांगितलं. 'पुण्य विकायचं आहे.' शेटची बायको साध्वी पतिव्रता होती. शेट नेहमी तिला विचारत असे. राजाला बसवून शेट आत गेला. बायकोला त्यानं विचारलं, 'काय करू? ' ती म्हणाली, 'त्यानं एका भुकेल्या कुत्रीला खायला घातलं; आपण उपाशीच राहिला. ते पुण्य त्याच्याकडून घ्या.'

शेटनं राजाला तसं सांगितलं. नोकराकडून बरीच हिरे-माणकं, व सोनं आणवलं. राजाला ते देऊ लागल्यावर त्याला कळलं, की आपलं पुण्य मौल्यवान आहे. ते विकू नये. त्यानं विचार बदलला. शेटला सांगितलं, ' माझं मन बदललं. आता मला पुण्य विकायचं नाही.'

तो शेटकडून निघाला. वाटेत परत त्या तलावाजवळ आला. जिथे त्यानं कुत्रीला भाकरी चारल्या होत्या, तिथे थोडावेळ बसला. तिथलीच दगड-माती फडक्यात बांधून घेतली. विचार करीत निघाला, की बायकोला आता काय सांगायचं? ती रागावणारच.

घरी आला बायकोशी काही न बोलताच दगड-मातीचं गाठोडं कोनाड्यात ठेवलं व बाहेर निघून गेला. बायकोला उत्सुकता होती, काय दिलं असेल शेटनं? तिनं कोनाड्यातलं गाठोडं काढलं व सोडून पाहिलं. ती चकितच झाली; गाठोड्यात मौल्यवान हिरे-जवाहरात होते! ती खूष झाली. राजा आल्यावर ती म्हणाली. 'शेट किती उदार आहेत ना! पाहा नं; ही केवढी संपत्ती मिळाली! '

आता चकित होण्याची वेळ राजाची होती. त्याला कळलं पुण्य विकता येत नसतं; पण त्याचं फळ मात्र जरूर मिळतं.

मित्रांनो, भुकेल्या प्राण्याला अन्न देऊन राजानं पुण्य पदरी बांधलं होतं. त्याच्या कृतीमागे कोणताही स्वार्थ नव्हता. त्याच्या मनात दया व करुणा होती; म्हणून स्वतः न खाता त्यानं अन्नदान केलं होतं. शेट व त्याची पत्नी हीही चांगली माणसं होती. पुण्य विकत घेता येत नाही हे त्यांनाही ठाऊक होतं. गरिबांचा स्वाभिमान न दुखावता शेट मदत करत असे. त्या निमित्तानं पुण्य केलेली माणसंच त्याच्याकडे येत व तो मदत करून पुण्य कमवत असे.

कुठलं ही दान श्रेष्ठच असतं. मात्र ते योग्य व्यक्तीला ( सत्पात्री )दिलं जावं. ते अयोग्य व्यक्तीला दिलं तर ते पापच ठरतं. शिवाय दान हे निरपेक्ष वृत्तीनं दिलं पाहिजे. तेव्हा पुण्य मिळेल असा विचारही दान करतांना मनात येऊ देऊ नये.

सत्यसाई-समितीतर्फे आपण दानाचे खूप उपक्रम करत असतो. अन्नवाटप म्हणजे नारायण-सेवा, कपडे, ब्लॅंकेट्स, वह्या-पुस्तके इ. गोष्टींचं वाटप करणं, ही बाबांचीच शिकवण आहे.

अलीकडच्या काळात नेत्रदानाबद्दल तुम्ही ऐकलंच असेल. नेत्रदान, देहदान व अवयव-दान याबद्दलही तुम्ही तुमच्या पालकांकडून किंवा बाल-विकास-गुरूंकडून जाणून घ्या. तेव्हा तुम्हाला कळेल की माणूस जिवंत असतांनाच काय, पण मेल्यानंतरही दान करू शकतो. समाजाचं ऋण फेडू शकतो!

# श्रेष्ठ दान; अवयव-दान

मित्रांनो, रिव्यानीची ही नुकतीच घडलेली कथा. तिचे आई-वडील म्हणजे सौ. कीर्ती व श्री. राधेश्याम रहांगडाले. या तिघांचे हे छोटेसे आदिवासी कुटुंब. आईवडील दोघेही पदवीधर. सहा वर्षांची रिव्यानी शाळेत एका नाटकात अंध मुलीचेकाम करत होती. त्या भूमिकेतून तिने नेत्रदान व अवयव-दानाचे महत्त्व प्रेक्षकांना पटवून दिले. तिचे काम इतके सुरेख झाले की बक्षीस तर मिळालेच; पण अशिक्षितांसह सर्व लोकांना अवयव-दानाचे महत्त्व पटले. आजकाल विज्ञान खूप पुढे गेलेअसल्यामुळे, मृतव्यक्तीचे चांगल्या अवस्थेतील हृदय, यकृत, डोळे, किडनी (वृक्क) हे सर्व अवयव गरजू रुग्णांना बसविता येतात. याला Transplant operation म्हणतात. रिव्यानीकडून तिच्या शिक्षकांनी चांगले काम करवून घेतले होते.

दुर्दैवाची गोष्ट अशी की रिव्यानी आपल्या काका-काकूंसोबत मोटरसायकल वरून प्रवास करत असतांना त्यांना मोठा अपघात झाला. तिघेही जबर जखमी झाले. पण वेदनाग्रस्तांना मदत करण्याऐवजी आसपासचे लोक मोबाईलवर फक्त फोटो घेत राहिले. यात एक तास गेला. नंतर एक भला माणूस आला व त्यांना, त्यातल्या त्यात जवळच्या हॉस्पिटलमध्ये घेऊन गेला. जखमांवर उपचार झाले. पण रिव्यानी बेशुद्धावस्थेतच होती. तिच्या मेंदूचे कार्य नीट होत नव्हते. एक आठवड्यानंतर डॉक्टरांनी मेंदू मृत झाल्याचे वडिलांना सांगितले; व अशा स्थितीत ठेवण्यात काही अर्थ नाही, हेही स्पष्ट केले. आईवडिलांचे अवसानच गळाले. त्यातही वडिलांनी विचारले, 'तिचे सर्व अवयव सुरक्षित आहेत ना? मग आम्ही अवयव दानाला तयार आहोत. डॉक्टरतर स्तंभितच झाले. शहरातील भले भले लोक जिथे तयार होत नसतात, तिथे हे आदिवासी कुटुंब या समाजकार्याला सहज तयार झाले होते. वडील राधेश्याम यांनी निर्णय घेतला. आईनेही संमती दिली.

त्यानंतर कागद-पत्रांची तातडीने पूर्तता झाल्यावर, रिव्यानीचे हृदय ठाणे येथे प्रतीक्षेत असलेल्या एका तीन वर्षांच्या मुलीला बसविण्यात आले. नागपूरला एका चाळीस वर्षांच्या रुग्णावर तिच्या यकृताचे प्रत्यारोपण करण्यात आले. नागपूर मधीलच एका नेत्रपेढीला डोळे दान करण्यात आले; त्यामुळे दोन अंधांना दृष्टीचा लाभ झाला! तिची किडनी एका चौदा वर्षांच्या मुलाला बसवून त्याला जीवदान मिळाले! डॉक्टर म्हणतात, एका लहानग्या मुलीचे इतके अवयव दानात मिळणे व इतर रुग्णांना त्याचा फायदा मिळणे, असे हे एकमेव उदाहरण असावे.

मित्रांनो, झालेली घटना दुःखदायक होती; पण रहांगडाले पति-पत्नींनी काळजावर दगड ठेवून हा सामाजिक जाणिवेचा निर्णय घेतला. रिव्यानीने नाटकातील भूमिकेतून सांगितलेले अवयव-दानाचे महत्त्व तिच्याच बाबतीत खरे होणार, हे त्यांनास्वप्नातही वाटले नव्हते. आई-वडिलांना हे पटले होते की, मृत्यूनंतर अवयव जाळून अथवा पुरून टाकले गेले, तर ते वायाच जातात. जर ते चांगल्या स्थितीत असतील तर इतर रुग्णांचा जीव तरी वाचू शकतो. मेल्यानंतरही सत्कार्य करता येते, हेचवरील कथा दाखवून देते.

18 एप्रिल 2018 ला हा अपघात घडला होता. त्यानंतरच्या आठ दिवसात, काही रुग्णांना या अवयव-दानाने जीवन मिळाले. खरेतर रिव्यानी त्यामुळे अमर झाली आहे. ज्या तीन वर्षाच्या मुलीवर हृदयाचे आरोपण झाले, तिचे आई-वडील रहांगडालेंना म्हणतात, ‘तुमच्याच मुलीमुळे आमची मुलगी वाचली आहे. ती आता तुमचीच आहे असे समजा व दुःख हलके करा.’

मित्रांनो, अवयव-दानाचे महत्त्व सर्व लहानमोठ्या माणसांना कळले पाहिजे. हे फार मोठे श्रेष्ठ दान आहे. मृत्यूनंतर त्या व्यक्तीला त्या अवयवांचा काहीच उपयोग नसतो. मग असे दान करून, काहींचा जीव वाचवून पुण्य मिळवायला काय हरकत आहे? सहा वर्षांच्या मुलीने हे महत्त्व पटवून दिले; तुम्ही बालविकासची मुले तर, जाणती आहात. म्हणून तुम्हाला ही

कथा सांगितली. कोणत्याही व्यक्तीचा, कोणत्याही वयात, नैसर्गिक मृत्यू झाला, तरीही डॉक्टरांना कळवून अवयव-दान करता येते.तुम्ही इतरांना याबाबत जागरूक करा.

मित्रांनो, या कथेतील एक भाग फार वाईट आहे. अपघातस्थळी जे लोक होते, त्यांनी ताबडतोब मदत केली असती तर रिव्यानीचे प्राण कदाचित वाचू शकले असते. त्याऐवजी ते मोबाईलवर फोटो काढत बसले!! असंवेदनशीलतेचं हे टोक आहे.असं कधीही करू नये. पोलिसांचा ससेमिरा नको म्हणून काहीजण अपघातग्रस्तांच्या पासून दूर राहतात. ही वागणूक माणुसकीला काळिमा फासणारी आहे. असे तुम्ही कधी वागू नका. Help ever; Hurt never ही शिकवण कधीही विसरू नका.

# ताजमहल

मित्रांनो, तुम्ही फेस बुक वर असालच. फेसबुकचे प्रमुख, मार्क झुकेरबर्ग तीन महिन्यांपूर्वी भारतात आले होते हे तुम्ही वाचलंच असेल. त्यांच्याकडे वेळ कमी असल्याने त्यांनी आपल्या देशातील केवळ एका शहरालाच 'साइट सीईंग' साठी भेट दिली. ते शहर म्हणजे आग्रा. आग्राच का? तुम्हाला समजलंच असेल! अर्थात ताजमहल बघण्यासाठी. खूप लोक परदेशातून मुद्दाम ताजमहल ही सुंदर इमारत बघण्यासाठी येतात व आश्चर्यचकित होऊन जातात. 400 वर्षांपूर्वी काही यांत्रिक सोयी नसतांना कारागिरांनी हे कसं उभं केलं असेल!! मार्कची प्रतिक्रिया काहीशी अशीच होती.

ताजमहल ही खरं तर मुमताजमहल राणीची कबर आहे. शाहजहान राजाचे तिच्यावर एवढे प्रेम होते की तिच्या मृत्यूनंतर तिच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्याने जगात इतरत्र नसेल अशी ही सुंदर कबर बांधली. प्रेमाचं प्रतीक म्हणून या इमारतीची ख्याती आहे. 1630 ते 1652 अशी बावीस वर्षे त्याचं बांधकाम चाललं होतं, वीस हजार मजूर सतत काम करत होते!

ताजमहलच्या आठवणीबरोबर आठवण होते ती एका उर्दू शायराची. साहिर लुधियानवी. त्यांची एक कविता आहे; शीर्षकच आहे ताजमहल. यात कवीनं वेगळीच कल्पना मांडली आहे. दोन प्रेमिक असतात; त्यातील ती त्याला म्हणते, 'आपण ताजमहल समोर भेटत जाऊ. म्हणजे आपलं प्रेमही असंच चिरंतन राहील.'

तेव्हा तो काय उत्तर देतो यासंबंधी ही कविता आहे, तो म्हणतो, 'नको; आपण इथे भेटायचं ही कल्पना मला पटत नाही. कबूल आहे की शाहजहानचं आपल्या पत्नीवर अतोनात प्रेम होतं. पण यात विशेष असं काय आहे? बादशहाचं प्रेम आणि सामान्य माणसाचं त्याच्या बायकोवर असणारं प्रेम यात काय फरक असणार? सगळ्यांचं आपल्या जोडीदारावर तसंच गाढ

प्रेम असतं. ज्या कारागिरांनी ताजमहल बनविला त्यांनी सुद्धा तसंच प्रेम केलं असणार. हंऽ, पण फरक एवढाच की त्या प्रेमाचं प्रदर्शन करायला त्यांच्याजवळ गडगंज पैसा नव्हता! ते लोक गरीब होते; म्हणून अशी स्मारकं बांधून आपल्या भावनांची जाहिरातबाजी करणं त्यांना शक्य नव्हतं!'

तो पुढे म्हणतो, ' मला तर वाटतं की पैशांच्या जोरावर शहाजहान बादशहाने आपल्यासारख्या गरीबांच्या प्रेमाची चेष्टाच केली आहे;खिल्ली उडवली आहे! म्हणूनच सांगतो,आपण दुसरीकडे कुठेतरी भेटत जाऊ या. इथे नको.'

60-70 वर्षांपूर्वी लिहिलेल्या या कवितेतील वेगळया विचारामुळे कवी साहिरला रातोरात प्रसिद्धी मिळाली. तेव्हा तो केवळ 22-23 वर्षे वयाचा होता.

आपल्या दृष्टीने साहिरच्या या कवितेचं महत्त्व लक्षात आलं ना तुमच्या? माणसं श्रीमंत असोत वा गरीब, त्यांच्या भावना सारख्याच असतात.श्रीमंतांचं प्रेम जास्त उत्कट, असं काही नसतं. पैशांवरून माणसाला लहान-मोठं ठरविणं हे सर्वस्वी चूक आहे. आपण आपली दृष्टी साफ व समान ठेवली पाहिजे. गरीबी-श्रीमंती, उच्च-नीच जात इ. गोष्टी हे समाजाचे डाग आहेत, कलंक आहेत.

आणखीही एक गोष्ट. ताजमहल पाहून किती लोकांना त्या मजूरांची आठवण होते? आपण ही सवय लावून घ्यायला हवी. समजा तुम्ही एखाद्या पुलावरून जात आहात;तेव्हा मनात यायला हवं की कोण बरं ते इंजिनियर्स असतील ज्यांनी या पुलाचा नकाशा तयार केला असेल? कितीतरी मजूरांचे हात दिवस रात्र, उन्हा-पावसात राबले असतील; तेव्हा आज आपण ही नदी, ही खाडी आरामात, कमी वेळात पार करत आहोत! ! त्या लोकांच्या प्रती आपण कृतज्ञ असायला हवं. ही भावना आपण सर्वांपर्यंत पसरवायला हवी. आपण रोज जेवण करतो. आपल्या मनात शेतकऱ्यांबद्दल विचार यायला हवा. तेही रात्रंदिवस राबतात. प्रवासात, असे शेतकरी शेतात राबतांना तुम्ही पाहिले असतील. मजूर,शेतकरी, सैनिक यांच्याबद्दल आपण मनात कृतज्ञता बाळगली पाहिजे.

बाबांनी आपल्याला शिकवण दिली आहे की पृथ्वीवर मानव ही एकच जात अस्तित्वात आहे; व सगळ्यांचा धर्मही एकच असायला हवा—प्रेमधर्म! आपण कोणत्या कुटुंबात जन्म घेतला किंवा आपल्याजवळ किती पैसे आहेत यावरून माणूस ‘माणूसः ठरत नाही. तो जेव्हा एकच मानवजात व एकच प्रेमधर्म मानेल तेव्हाच तो ‘खरा माणूस’ होईल. एकदा ते साध्य झालं की ‘वसुधैव कुटुंबकम्’ ही कल्पना प्रत्यक्षात उतरायला वेळ लागणार नाही. ही जबाबदारी आता तुमच्या पिढीवर आहे.

# सेवा व्रत

मित्रांनो, फ्लॉरेन्स नाइटिंगेल हे नाव तुम्हाला माहीत आहे? आपण आज तिच्याबद्दल जाणून घेऊ. जगातील ही पहिली परिचारिका. रुग्णांची सेवा करणारी नर्स. सिस्टर. नर्सिंग या उदात्त व्यवसायाची सुरुवात तिच्यापासून झाली.

फ्लॉरेन्स चा जन्म इटलीमधील फ्लॉरेन्स नावाच्याच गावी 12 मे 1820 साली झाला. ती  एक वर्षाची असतांना तिचे कुटुंब लंडन(इंग्लंड) येथे स्थलांतरित झाले. श्रीमंत कुटुंबात जन्म झाल्यामुळे 'दु:ख' म्हणजे काय हे तिला ठाऊकदेखील नव्हते. एके दिवशी योगायोगाने तिने जिनिव्हा (स्वित्झरलंड) येथील हॉस्पिटल बघितले. तेथील रुग्ण व हॉस्पिटल पाहून ती बेचैन झाली. फाटलेल्या चादरी, मळलेले रग व सगळीकडे अस्वच्छता. घाणीचे साम्राज्य. त्यातच पीडित रोगी. त्यांची देखभाल करणारेसुद्धा निरोगी नव्हते व त्यांना व्यसनेही होती. ते पाहून, सोळाव्या वर्षीच फ्लॉरेन्स ने ठरविलं की चांगलं 'नर्सिंग' म्हणजे काय ते मी लोकांना दाखवून देईन.

आई-वडिलांनी तिला सांगितले की आपल्या उच्चभ्रू घराण्यात असले वेड काही चालणार नाही. पण तिचा निश्चय कायम होता. विरोध पाहून तिने घरच सोडले!! ऐषोआरामाचे जीवन सोडून ती लंडनच्या एका इस्पितळात दाखल झाली व तिने काम सुरू केले. तेथे तिने बऱ्याच सुधारणा केल्या.

तिचे काम पाहून एक मिलिटरी ऑफिसर, हर्बर्ट, खूप प्रभावित झाले. याच काळात क्रिमिया (तुर्कस्तान) येथे युद्ध सुरू झाले होते. जखमी सैनिकांना नर्सिंगची गरज होती. तेव्हा हर्बर्ट यांनी तिला तिथे जाण्याची विनंती केली. ही देशसेवेची संधी आहे असे समजून फ्लॉरेन्स तिकडे निघाली. तिने आधीच ज्यांना ट्रेनिंग दिले होते अशा 38 सहकारी नर्सेस तिच्यासोबत होत्या.

युद्धभूमीवर सतत सैनिकांची सेवा करावी लागत असे. रात्री इतर नर्सेस व डॉक्टर्स विश्रांती घेत तेव्हा अंधारात, हातात एक कंदील घेऊन फ्लॉरेन्स जखमी व विव्हळणाऱ्या सैनिकांजवळ पोहोचे. त्यांची देखभाल करी. ताजी मलमपट्टी करी. त्यांच्याशी सांत्वनाचे चार गोड शब्द बोले. जाता-येता ती मंजुळ आवाजात गाणे गुणगुणत असे. गाणाऱ्या नाइटिंगेल पक्ष्यासारखा तिचा मधुर आवाज सैनिकांचे दुःख हलके करत असे. यामुळे तिला फ्लॉरेन्स नाइटिंगेल असे नाव पडले तसेच तिला जखमी सैनिक आदराने ‘लेडी विथ द लँप’ असेही म्हणू लागले. ती केवळ कंदील घेऊन येत असे म्हणूनच नव्हे, तर ती त्यांच्या जीवनात जगण्याच्या आशेचा प्रकाशही आणीत होती!

युद्ध संपले. फ्लॉरेन्सच्या कामाचे खूप कौतुक झाले. ती लंडनला परतली. ती स्वस्थ बसणाऱ्यांपैकी थोडीच होती? तिने लंडन मध्ये एक ‘नर्सिंग स्कूल’ सुरू केले. जगातले पहिले नर्सिंग स्कूल! आज ते लंडन कॉलेजला जोडले गेले आहे.

तिच्या कामाची दखल राजघराण्यानेही घेतली. इंग्लंडच्या राणी व्हिक्टोरिया यांनी तिला ‘रेड क्रॉस मेडल’ देऊन तिचा गौरव केला. तिच्या कामाचे महत्त्व ओळखून जगात अनेक ठिकाणी नर्सिंग कॉलेजेस निघाली. पुण्यात ससून हॉस्पिटलला जोडून असे कॉलेज आहे. चार वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर नर्सेस जी ‘शपथ’ घेतात, त्यामध्ये फ्लॉरेन्स नाइटिंगेल ची आठवण करून तिच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते. डॉक्टरी व्यवसायाइतकाच याही व्यवसायास आज प्रतिष्ठा मिळालेली आहे.

1973 सालापासून भारतानेही ‘फ्लॉरेन्स नाइटिंगेल अवॉर्ड’ सुरू केले आहे. निष्ठेने व करुणापूर्ण भावाने सेवा करणाऱ्या परिचारिकेला ते देण्यात येते.या व्यवसायात पूर्वी फक्त स्त्रियाच असत. पण आता पुरुष परिचारक देखील असतात.त्यांना ‘ब्रदर’असे संबोधण्यात येते. या वर्षापासून भारत सरकारने, एक जून हा दिवस ‘नर्सिंग केअरिंग डे’ म्हणून पाळावा असे घोषित केले आहे.

मित्रांनो, तुम्हाला प्रश्न पडला असेल की सेवा करण्यास हॉस्पिटल हेच एक ठिकाण आहे का? उत्तर आहे, 'नाही'! सेवा ही अगदी साधी गोष्ट आहे. दुसऱ्यासाठी केलेले व मोबदला न घेता केलेले कुठलेही काम म्हणजे सेवा. कुठल्याही परतफेडीची अपेक्षा न करता दुसऱ्याला केलेली मदत म्हणजे सेवा! परिचारकांना मिळणाऱ्या पगारापेक्षा कितीतरी अधिक पटींनी ते मनोभावे व करुणायुक्त सेवा रुग्णांना देत असतात.

स्वामी नेहमी सांगत, मानवसेवा हीच माधवसेवा आहे'. याचा नेमका अर्थ माहीत आहे? सृष्टीतील प्रत्येक घटकात, चराचरात ईश्वर आहे. आपण ही गोष्ट सतत लक्षात ठेवली पाहिजे. एखाद्या अंध व्यक्तीस तुम्ही रस्ता क्रॉस करायला मदत केली असेल, तुमच्या मित्राचा हात मोडला असतांना त्याला अभ्यास कॉपी करून दिला असेल, भूकंपग्रस्तांसाठी पैसे गोळा केले असतील, तुमच्या आजीला सुई ओवून दिली असेल. अशी छोटी कामेही 'सेवा' या सदरात मोडतात. फक्त तुम्ही त्यावेळी समोरच्या व्यक्तीमधे ईश्वराला पाहिले पाहिजे. मी यांना मदत केली, असा अहंकारही येता कामा नये. निःस्वार्थ मनाने तुम्ही जे इतरांसाठी कराल ती सेवा! अशी सेवा करून, पाहा किती आनंद मिळतो ते! ! 23 नोव्हेंबर ला भगवान बाबांचा जन्मदिन आहे.त्यानिमित्त आपण सारे सेवाव्रत घेऊ या.

# छोट्या मिनीची मोठी गोष्ट

आज मी जी गोष्ट सांगणार आहे ना, ती बऱ्याच वर्षांपूर्वी मी वाचली होती. पण काही गोष्टी अशा असतात की आपण त्या विसरू शकत नाही. ही गोष्ट मिनी नावाच्या छोट्या मुलीची आहे. तिचं वय होतं पाच वर्षं. एक दिवस ती शाळेतून आली अन् पळत पळत आजीजवळ गेली. आजीनं तिला मांडीवर घेतलं अन् म्हटलं, 'ये बेटा; आज फार आनंदात दिसतेयस'!

'आजीऽ, माझा पहिला नंबर आला! मी पास झाले.' मिनी म्हणाली. आजीनं मिनीला प्रेमाने कुरवाळलं आणि जवळचे पाच रुपये काढून दिले.

'जा; तुला हवं ते चॉकलेट घेऊन ये.'

मिनी आनंदानं बाहेर गेली. दुकानं जवळच होती. मिनी मुख्य रस्त्यावर आली.तिथे खूपच गर्दी जमलेली तिला दिसली. लोक हातात फुलांच्या माळा वगैरे घेऊन उभे होते. एका बाजूला सर्वजण बघत होते जणू कोणाची तरी वाट बघत असावेत. त्यातीलच एका काकांना मिनीने विचारले.' अंकल, तुम्ही कोणाची वाट पाहात आहात? ' काका म्हणाले,' आपल्या गावातला एक जवान सीमेवर हुतात्मा झाला, त्याची अंत्ययात्रा इथून जाणार आहे. म्हणून आम्ही त्याला हार घालून वंदन करणार आहोत.'

मिनीला फारसं काही समजलं नाही. पण कुणीतरी मोठा माणूस असणार, आपणही त्याला हार घालावा असं वाटून ती धावतच जवळच्या फूलवाल्याकडे गेली.

'मलाही एक हार द्या; हे घ्या पाच रुपये.' मिनी म्हणाली.

फूलवाला म्हणाला, 'बेटा, पाच रुपयात हार नाही येणार; हां, एक गुलाबाचं फूल देतो. 'चालेल' मिनीनं मान डोलवली. फूल घेऊन धावतच ती गर्दीकडे आली. तेवढ्यात हुतात्मा

जवानाचे पार्थिव ठेवलेला ट्रक तिथे येऊन पोहोचला होता. मिनीला फुलासह धावत येतांना पाहून ट्रकबरोबर चालणारा एक जवान पटकन् तिच्याजवळ आला व तिला कडेवर उचलून ट्रकजवळ घेऊन गेला. सगळया लोकांचं पाहून मिनीनं हातातलं फूल शहीद जवानाच्या पार्थिवावर वाहिलं आणि इतरांप्रमाणे नमस्कारही केला. जवानाच्या कडेवरून उतरूच मिनी धावतच घरी निघाली. सगळे लोक भावुक होऊन मिनीकडे पाहात होते, ‘ह्या एवढ्याशा मुलीनंही जवानाला श्रद्धांजली वाहिली! ’

तेवढ्यात फुलवाल्याने मिनीला बोलावले व पाच रुपये परत करून म्हटले, ‘ हे घे पैसे परत. तू तर आज माझ्या फुलाचाच सन्मान केला आहेस’

मिनीला काही कळले नाही पण पैसे घेऊन ती आजीकडे परत आली. जमेल तशी हकीगत सांगून तिनं आजीला विचारलं, ‘आज्जी, हुतात्मा म्हणजे काय ग? मी आज त्याला फूल वाहिलं.’

आजी म्हणाली, ‘तुम्ही शाळेत कधी कधी आपसात भांडता नं? तसेच दोन देशही क्वचित भांडतात. त्यांच्याजवळ बंदुकाही असतात; मग कधी कधी एखाद्या सैनिकाला देशाकरता प्राण गमवावे लागतात. त्याला म्हणतात हुतात्मा; म्हणजेच शहीद. सैनिक सीमेवर लढून आपल्या देशाचं म्हणजे देशातल्या लोकांचं रक्षण करतात. आपल्यासाठी त्यांचा जीवही देतात. म्हणूनच आपण सैनिकांबद्दल कृतज्ञ राहिलं पाहिजे. तू चांगलं केलंस, चॉकलेट न घेता तू फूल वाहून त्या जवानाला सन्मान दिलास. ‘

‘पण फुलवाल्यानं तर पैसे परत दिले! ’ आश्चर्याने मिनी म्हणाली.

आजीने सांगितलं, ‘हं, त्यानंसुद्धा जवानाबद्दल आदर दाखवला.’

मिनी गंभीर होऊन म्हणाली, ‘आज्जी गऽ,मी सुद्धा मोठ्ठी झाल्यावर देशासाठी लढणार! ’

आजीनं कौतुकानं हसून मिनीच्या गालावर एक हलकेच थप्पड मारून म्हटलं,

‘आधी मोठ्या तर व्हा, बाईसाहेब! ’

मित्रांनो, मिनीची गोष्ट आपल्यालाही खूप काही शिकवून जाते; नाही का?

## मनुष्यजन्म-अनमोल हिरा.

मित्रांनो, ही एक जुनी गोष्ट आहे. एक राजा होता.एक दिवस तो सर्व लावाजम्यासह शिकारीला जंगलात गेला. दिवसभर हिंडूनही शिकार काही मिळाली नाही. शोधत शोधत राजा दूर गेला व आपल्या सैनिकांपासून दूर जंगलात भरटकत गेला. साथीदार सुटले. एकटा राजा जंगलात हिंडत राहिला. संध्याकाळ झाली. राजाला वाटले आता आसरा कुठे मिळणार? अंधार पडू लागला.राजाला भूकही लागली होती. काय करावे काही सुचेना.

राजाचे नशीब बलवत्तर होते. अंधारात एके ठिकाणी लांब उजेड दिसला. राजा त्या दिशेने चालू लागला. अखेर एक झोपडी दिसली. कोणी एक लाकूडतोड्या आपल्या बायकोसह तेथे राहत होता. राजा साध्याच वेषात असल्याने त्यांनी त्याला ओळखले नाही. राजाने सांगितले, ‘मी खूप दमलेलो आहे; मला भूकही लागली आहे.काही व्यवस्था होईल का? ’ ‘अतिथी देवो भव’ ( आलेला पाहुणा हा देवच आहे) असे समजून लाकूडतोड्याने त्याचे स्वागत केले. त्याच्या पत्नीने भाजी भाकरी तयार केली व राजाला गरम गरम जेवण वाढले. राजा भरपूर जेवून तृप्त झाला. लाकूडतोड्याने कांबळं आणून दिलं त्यावर गाढ झोपून गेला.

राजाचा लवाजमा त्याला शोधत शोधत झोपडीपर्यंत पोहोचला तोवर पहाट झाली होती. सैनिक व लवाजमा पाहिल्यावर लाकूडतोड्या घाबरून गेला. आपण राजाला ओळखले नाही व त्याच्या इतमामाप्रमाणे त्याची खातिरदारी केली नाही; आता याबद्दल आपल्याला शिक्षा होणार! असा विचार त्याच्या मनात आला; पण झाले उलटेच!

राजाने लाकूडतोड्याचे व त्याच्या पत्नीचे आभार मानले. भुकेच्या वेळी मिळालेल्या भाजी-भाकरीनेही तो संतोषला होता. त्याने विचारले, ‘तू पोट भरण्यासाठी काय करतोस? ’

लाकूडतोड्या म्हणाला, ‘लाकडं तोडून गावात जाऊन विकतो; लोकांना इंधन लागते. ते धान्य, पीठ असं काहीबाही देतात.त्यावर चालतं’

राजानं आपल्या प्रधानाला सांगितलं की अमुक ठिकाणी जी चंदन वाटिका आहे ती याला द्या.तिथेच त्याची राहण्याची व्यवस्थाही करा.’

एवढे सांगून राजा व बरोबरचे लोक निघून गेले.

प्रधानाने राजाच्या आज्ञेप्रमाणे लाकूडतोड्याची सर्व व्यवस्था केली. मधे बराच काळ गेला. राज्याचे कामकाज पाहण्यात राजा गर्क होता. तो लाकूडतोड्याला विसरून गेला होता. अचानक एक दिवस त्याला आठवण झाली. प्रधानजी कडून त्याने माहिती विचारली; व तो स्वतःच वाटिके वर जाऊन पोहोचला. लाकूडतोड्याची आर्थिक स्थिती आता पूर्वी पेक्षा बरी असेल; चंदन विकून मोहरा मिळत असल्यामुळे त्याचे छान चालले असेल, अशी राजाची अपेक्षा होती. पण पाहिले तो काय? लाकूडतोड्याच्या परिस्थितीत काहीच फरक नव्हता!

राजाने विचारल्यावर लाकूडतोड्या म्हणाला की तो ती लाकडं जाळून कोळसा करतो,व तो कोळसा विकतो! राजाने सांगितल्यावर तो म्हणाला की,’चंदन म्हणजे काय, त्याचा उपयोग काय अन् त्याचं मोल काय हे मला काहीच माहिती नाही!!’

राजाने कपाळाला हात लावला!

आपल्याला काय लाभलं आहे ते किती मौल्यवान आहे हे न समजल्यामुळेच लाकूडतोड्याची उन्नती झाली नाही. गोष्ट इथेच संपली.

स्वामी आपल्याला सांगत असत, ‘मानव-जन्म यासाठी मिळाला आहे की तुम्ही स्वतःची आध्यात्मिक उन्नती करून घेतली पाहिजे. प्रत्येक जीव हा ईश्वराचा अंश आहेः व जिवाची शिवाशी भेट होण्याकरता या जन्मात वर्तणूक ठेवली पाहिजे.ज्ञानाची कास धरली पाहिजे.’

हा उपदेश विसरून आपण भौतिक गोष्टीतच गुंतून राहतो. पण त्या गोष्टी अशाश्वत म्हणजे न टिकणाऱ्या आहेत. म्हणून हा अनमोल जन्म आपण अशा गोष्टीत वाया घालवता कामा नये.  कबीर आपल्या एका दोह्यात म्हणतात,

रात गंवायी सोयकर, दिवस गवाया खाय ।

हीरा जनम अमोल था, कवडी बदले जाय ।।

रात्र तू झोपून घालवलीस दिवस खाण्यापिण्यात गेला. तुझा मनुष्यजन्म हा अनमोल हिरा होता; तो तू इतर फालतू गोष्टी जमविण्यात व करण्यात घालवतो आहेस. हिरा देऊन कवडी घेतल्यासारखंच झालं की!

म्हणून सावध रहा.

# ते ऑपरेशन

ही गोष्ट आहे जावेदची. जावेद एक पत्रकार होता. तो हृदयरोगावर एक लेखमाला लिहीत होता. म्हणून तो आज हॉस्पिटलमध्ये आला होता. तिथे हृदयावर एक गुंतागुंतीचे ऑपरेशन होणार होते. ते पाहण्याची परवानगी त्याला या लेखामालेमुळे मिळाली होती. ऑपरेशनची जय्यत तयारी झाली होती. अनेक प्रकारच्या सुऱ्या- कातऱ्या ...मशीन्स..आणि अनेक डॉक्टर्स....नर्सेस...पण कोणी कोणाशीही चकार शब्द बोलत नव्हते. त्यामुळे थिएटर मधील थंड वातावरण अधिकच गंभीर झाले होते.

रुग्णाला ढकलगाडीवरून आत आणण्यात आले. जावेद विशिष्ट पोषाख चढवून वरच्या गॅलरीत बसून हे सारे पाहात होता. हिरव्या रंगांच्या टोप्यातून सर्व माणसांचे फक्त डोळे दिसत होते. जावेदला अशा वातावरणाची अजिबात सवय नव्हती. त्याला थोडे अस्वस्थही वाटू लागले. तेवढ्यात मुख्य डॉक्टर आले. तेही हिरव्या पोषाखात होते. सगळे सज्ज झाले. रोग्याला भूल दिली गेली. मुख्य डॉक्टरांनी आपल्या सराईत हातांनी रोग्याच्या छातीवर मोठा 'कट' घेतला. त्याबरोबर लालभडक रक्त एकदम उसळून वर आले. जावेदला ते पाहून कसेतरीच वाटू लागले. त्याच्या डोक्यात मुंग्या आल्या. त्याला समोरचे काही दिसेनासे झाले. पण त्याच्याकडे बघायला कोणाला वेळ नव्हता.

त्याच्या डोळयांपुढे निराळयाच- बहुधा भूतकाळातील- प्रतिमा तरळू लागल्या. ती एक संध्याकाळ होती. त्याला कॉलेजला प्रवेश घ्यायचा होता. दहावी नंतर त्याने बारावी पास केली होती. मार्क काही फारसे चांगले नव्हते. पण मित्रांबरोबर कॉलेज ची मजा अनुभवायची होती. पण त्या संध्याकाळी अब्बांनी हाक मारली.

'बेटा, मी तुला कॉलेजच्या फीचे पैसै नाही देऊ शकत....'

'पण का, अब्बू? ' त्याने भुवया आक्रसून विचारले.  ते म्हणाले, 'तुला माहीत आहे रुबिया—तुझी मोठी बहीण देखील शिकते आहे. तिचा खर्च आहे. ती हुषार आहे . आणि तुला माहीत आहे की दोघांची फी भरण्याइतली माझी ऐपत नाही.... तू कुठेतरी नोकरी धर.... अभ्यासात तुलाही रस नाहीच आहे. होना?

अब्बांनी सांगितले म्हणजे ती आज्ञाच होती त्यांची. त्यांच्या रागाची त्याला भीती वाटत असे. जावेदला खूप वाईट वाटले. 'आपले मित्र खूप मजा करतील नि आपण मात्र....'

पण उपयोग नव्हता. रुबियाचे शिक्षण पुढे चालू राहिले. मित्र म्हणाले, 'अरे! तू मुलगा असून तुझी फी न भरता, तुझ्या बहिणीची मात्र भरणार? विचित्रच आहे हे.! त्याने छोटीशी नोकरी केली व साईड बाय साईड पत्रकारितेचा कोर्सही केला...... अब्बांना अर्धांग वायूचा झटका आला. आता रुबियाच्या पुढच्या शिक्षणाचे काय?

पुन्हा अब्बांनी विनंती केली ' बेटा तुझे पैसे रुबियाला देशील? '

'पण मला पियानो घ्यायचा आहे! माझे स्वप्न आहे ते. मी ऑरकेस्ट्रा जॉईन केला आहे. तिथेही मला पैसे मिळतात; ते मी पियानो साठी.....'

बेटा, माझी खात्री आहे की तू 'नाही' म्हणणार नाहीस; जरा माझ्याकडे पाहा....'

जावेदने मुकाट्याने रुबियाच्या शिक्षणासाठी पैसे दिले. मनातून त्यालाही माहीत होते, की रुबियासारख्या हुषार मुलीचे शिक्षण थांबणे योग्य नाही.पण मग त्याचे शिक्षण.... पियानो सर्वच राहून गेले.....

तेव्हढ्यात......

ऑपरेशन थिएटरमधील शांतता भंग पावली.डॉक्टर्स एकमेकांशी हलक्या आवाजात बोलू लागले. जावेदची तंद्रीही भंग पावली. तो भानावर आला. तो थिएटरमधून बाहेर आला.

रोग्याचे सचिंत नातेवाईक बाकावर बसले होते. उठून त्यांनी अपेक्षित नजरेने जावेदकडे पाहिले. जावेद त्यांना इतकेच म्हणाला, ‘ डॉक्टर इतक्यात येतीलच! ’

नातेवाईक म्हणजे रुग्णाचे आईवडील होते. रुग्ण होता त्यांचा सोळा वर्षांचा मुलगा. लहान वयापासून त्याला हृद्रोग होता....पण ऑपरेशनसाठी या वयापर्यंत थांबणे जरूर होते. जावेदने रुग्णाच्या वडिलांच्या खांद्यावर थोपटले. व तो दूर जाऊन उभा राहिला....

तेवढ्यात ऑपरेशन करणारे सर्जन आले. त्या एक स्त्री-सर्जन होत्या. त्या रुग्णाच्या नातेवाईकांना म्हणाल्या, ‘सर्व काही ठीक झाले आहे. आता तुमचा मुलगा पूर्णपणे बरा होईल. अजून तीन तास तुम्ही त्याला बघू शकणार नाही. नंतर रिकव्हरी रूममधे जाऊन एकच मिनिट तुम्ही त्याला पाहू शकता. पण आता कँटिन मधे जाऊन काही खा, प्या....काळजी सोडून द्या. ’ एवढे बोलून त्या जावेदजवळ आल्या. जावेदने हळूच त्यांचे हात हातात घेतले व एवढेच म्हणाला, ‘ चल थोडी कॉफी घेऊ या? ’

डॉक्टर यंत्राप्रमाणे त्याच्यामागे चालू लागल्या! चालता चालता जावेद म्हणाला,

‘आज तू एक जीव वाचवलास....तुझं ज्ञान, तुझं कौशल्य.....तुझा आत्मविश्वास! कमालका है!! ...मला तुझा अभिमान वाटतो.

डॉक्टर म्हणतात, ‘पण अजूनही तुला वाईट वाटतं ना, तुला पियानो घेऊन शिकायला मिळाला नाही याचं? ’

जावेदने दाटल्या कंठाने उत्तर दिले, ‘नाही नाही यापुढे कधीच वाटणार नाही. मला एवढेच आठवेल की माझ्या बहिणीने एक जीव वाचवला....

‘रुबिया, तू तुझं शिक्षण पूर्ण केलंस हेच योग्य झालं. अब्बांचा निर्णय योग्यच होता.’

मित्रांनो, मुलगा असो अथवा मुलगी; प्रत्येकाला शिक्षणाची समान संधी मिळायला हवी. पण समान याचा अर्थ असा नाही की दोघांना एकच शिक्षण . ज्याच्या त्याच्या कुवतीनुसार समान संधी! मुलगा-मुलगी असा भेद न करता, माता –पित्यांनी त्यांना वागविले पाहिजे, हाच संदेश वरील कथेवरून मिळत नाही काय? ....

## कसं वाटलं पुस्तक मित्रांनो?

फ़ुकट असलं तरी दर्जेदार आहे ना?

काही लोकांचा असा समज आहे की जे फ़ुकट मिळतं ते कमी दर्जाचं असेल. पण तसं नसतं. आपल्याला आपले आईवडील मिळतात ना की ते आपण विकत घेतो? आणि त्यांचे संस्कार? आणि आपला देश आपलं राष्ट्रीयत्व? अगदी आपल्या आजूबाजूच्या हवेतला ऑक्सिजनही फ़ुकटच मिळतो ना. आणि हा मौल्यवान मनुष्यजन्मही फ़ुकटच मिळाला की आपल्याला!

तेव्हा मित्रांनो जे जे फ़ुकट ते ते फ़ालतू असा समज असलेल्या लोकांना एकदा ई साहित्यच्या साइटवर आणा. ई साहित्यची पुस्तकं वाचायला द्या. तुम्ही जे पेराल तेच उगवेल. जर तुम्ही समाजात चांगली मूल्यं पेराल तर तुम्हालाही या समाजात चांगली वागणूक मिळेल. समाज म्हणजे आपणच की. निदान आपल्या आजूबाजूचा समाज तरी मूल्यप्रधान करुया.

चला तर मित्रांनो, एक भव्य चळवळ उभारुया. यात प्रत्येकाने आपला सहभाग घेतला तर हा बाराकोटींचा महाराष्ट्र जगातला सर्वोत्कृष्ट अभिरुचीपूर्ण वाचकांचा प्रदेश बनायला वेळ लागणार नाही.

टीम ई साहित्य

esahity@gmail.com

www.esahity.com

एक प्रसन्न अनुभव